रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २०९
www.ramprahar.com
शुक्रवार, १४ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अमेरिकेत जंगी स्वागत



**वॉशिंग्टन :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा गुरुवार (दि.१३)पासून थाटात सुरू झाला असून, राजधानी वॉशिंग्टन डीसी येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. ब्लेअर हाऊससमोर उपस्थित भारतीय समुदायाने 'भारत माता की जय' आणि 'मोदी मोदी'च्या घोषणांनी मोदींचे स्वागत केले. पंतप्रधान मोदी यांनी त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट करत ट्रम्प यांना भेटण्यासाठी आपला उत्साह दर्शवला आहे. पंतप्रधान मोदींच्या दोन दिवसांच्या दौऱ्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत व्यापार, संरक्षण, ऊर्जा, आणि इमिग्रेशन अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर आपल्या स्वागताचे छायाचित्र शेअर केले आहे.

अंतरंग
'मोतीबिंदू मुक्त राज्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील'/२
महिलांना आर्थिक साक्षर करणे महत्त्वाचे -मंत्री तटकरे/५
आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी जामनेर सज्ज/८

# 'जलयुक्त शिवार'मुळे महाराष्ट्रात जलक्रांती

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले जलयुक्त शिवार अभियान हे महत्वाकांक्षी अभियान असून. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून झालेली कामे ही जलक्रांतीच्या दिशेने पडलेले पाऊल आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित जलसंधारण अधिकारी गट ब (अराजपत्रित) नियुक्ती पत्राचे (रिमोटद्वारे ऑन लाईन पद्धतीने) वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले.

जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या ६०१ अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवावे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाई दूर करून शाश्वत शेतीसाठी पाण्याची



उपलब्धता निर्माण करणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील गावे जलयुक्त झाली असून भूजल पातळीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले, ज्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली. भूजल पातळीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात पीक घेता येऊ लागली हे या अभियानाचे यश आहे.

भविष्यात ही योजना अधिक काटेकोरपणे, नियोजनबद्ध तंत्रज्ञानाधारित आणि स्थानिक सहभाग घेऊन अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणारे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### 'लोकसहभागाने अभियानाचे यश'

मृद व जलसंधारण मंत्री राठोड म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यात सुरू झालेल्या जलयुक्त शिवार अभियानाने क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश असून या अभियानात मिळालेला लोकसहभाग हे या अभियानाचे यश असल्याचे राठोड यांनी सांगितले.

## 'युवा पर्यावरण संसद'मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने युवा पर्यावरण संसदचे आयोजन गुरुवारी (दि.१३) करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन विधानसभेमध्ये कामकाज कश्या प्रकारे चालते, सकारात्मक चर्चेचे महत्त्व याबाबत माहिती देत समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य सर्वांनी बजावले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी आंतर 'महाविद्यालयीन




पर्यावरण युवा संसद झाली. या संसदेत के. एल. ई कॉलेज, पिल्लेज कॉलेज, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲप्स सायन्स, एस. के कॉलजे नेरुळ आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेचे संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेचे संचालक संजय भगत, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, पनवेल महापालिकेचे आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर, अयुफ अकुला यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)

## माजी आमदार राजन साळवी यांचा शिवसेनेत प्रवेश



**ठाणे : प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर-लांजाचे माजी आमदार राजन साळवी यांनी शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत उपनेतेपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर गुरुवारी (दि.१३) साळवी यांनी काही कार्यकर्त्यांबरोबर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. ठाण्यातील आनंद आश्रम येथे हा कार्यक्रम झाला.

पक्षप्रवेशानंतर राजन साळवी म्हणाले की, माझ्याबरोबर आलेले राजापूर लांजा मतदारसंघातील सर्व मतदार, माझे शिवसैनिक, माझे पदाधिकारी त्यांना योग्य तो सन्मान आणि योग्य त्या अनुषंगाने जे काही देता येईल ते द्यावे. माझ्यापेक्षा माझ्या पदाधिकाऱ्यांना सांभाळावे अशी विनंती करतो, असे राजन साळवी म्हणाले.


## आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचा उद्या पारितोषिक वितरण समारंभ

### 'आज्ञीबाई जोरात' एआय महाबालनाट्याची विद्यार्थ्यांना पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ येत्या शनिवारी म्हणजेच १५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत यांची प्रमुख भूमिका असलेले आज्ञीबाई जोरात हे पहिले एआय महाबालनाट्य सादर होणार आहे.

या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ यांची उपस्थिती लाभणार असून सोहळ्याचे उदघाटन लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी भाजपचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



सर्वसाधारणपणे भावना व्यक्त करण्यासाठी संवाद साधणे आवश्यक असते. वक्तृत्व जर प्रभावी असेल तर ते परिणामकारक ठरते. शिवाय ती एक ताकद असते, जी विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व करण्यासाठी उपयुक्त ठरते. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना आपल्या भावना व्यवस्थितपणे मांडता याव्यात व त्यांची वक्तृत्व शैली विकसित व्हावी या उद्देशाने कोशिश फाऊंडेशनच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनकडून अनेक सेवाभावी उपक्रम राबविले जातात. पनवेलमधील पर्यावरणीय प्रगतीशील परिवर्तनाला चालना देण्यासाठी आणि सकारात्मक वातावरणीय बदलासाठी कोशिश फाऊंडेशनच्या माध्यमातून ऑक्सि पार्क साकारण्यात आला आहे. त्याचबरोबर सातत्याने वृक्षारोपण करून पर्यावरणाचे जतन व संवर्धन केले जाते. याशिवाय वर्षभर निरनिराळ्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, सूर्यनमस्कार स्पर्धा, घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा यांसारख्या स्पर्धांचा समावेश असतो. गायकांना व्यासपीठ मिळावे याकरिता पनवेल शहरातील प्रसिद्ध वडाळे तलाव या ठिकाणी सूर पनवेलचा कार्यक्रमांतर्गत मैफिल भरवली जाते. भविष्यातही कोशिश फाऊंडेशनचे प्रकल्प, उपक्रम नियोजित आहेत. (पान २ वर..)

### निवडक

#### शास्त्रीय गायक पं. प्रभाकर कारेकर यांचे निधन



**मुंबई :** प्रसिद्ध हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत गायक पंडित प्रभाकर जनार्दन कारेकर यांचे बुधवारी रात्री त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले आणि सुना-नातवंडे असा परिवार आहे. हिंदुस्थानी संगीतातील स्वर भास्कर दिगंतात विसावला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

#### राज्यातील 'जीबीएस'ची रुग्णसंख्या २०३वर

**पुणे :** राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील खासगी रुग्णालयात रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. यामुळे राज्यात आतापर्यंत मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या आठ झाली आहे. राज्यातील जीबीएसची रुग्णसंख्या २०३ वर पोहचली आहे. त्यातील १७६ रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. राज्यभरात १०९ रुग्णांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

## ६५ वर्षांवरील रिक्षाचालकांना १० हजार रुपये मिळणार!

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांची घोषणा



**मुंबई : प्रतिनिधी**

आम्ही कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून जे आदर्श रिक्षा चालक आहेत. त्यांना पुरस्कार देणार आहोत. पाच वर्षांपूर्वीची नोंदणी असलेले ६५ वर्षांच्या वरिल जे काही रिक्षाचालक आहेत, त्यांना आम्ही प्रत्येकी १० हजार रुपयांचे अनुदान देणार आहोत. आजच्या घडीला राज्यात १४ हजार ३८७ रिक्षालाचक हे ६५ वर्षांवरिल आहेत. त्यांना यावर्षी आम्ही १० हजारांची रक्कम देणार आहोत, अशी घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. ते मुंबई पार पडलेल्या आनंद दिघे महामंडळाच्या बैठकीत बोलत होते.

प्रताप सरनाईक म्हणाले, ज्यावेळी माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते आदरणीय एकनाथ शिंदे साहेबांनी आमच्या दिघे साहेबांच्या नावाने मंडळ स्थापन केले. आम्ही आता निर्णय घेतलाय की, २७ जानेवारी हा या महामंडळाचा वर्धापन दिन असेल. ५० कोटी रुपयांची तरतूद या महामंडळासाठी करण्यात आलेली आहे.

पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, ठाण्यात मुख्य कार्यालय धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावाने हे मंडळ स्थापन झाले. २७ जानेवारी हा वर्धापनदिन असेल. ५० कोटी रुपयाची भरघोस तरतूद करण्यात आली आहे. लोगोचं प्रकाशन १ मार्च रोजी करणार आहोत. परिवहन मुख्य कार्यालयात भूमिपूजन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन होईल. राज्यातील एक लाखापेक्षा रिक्षा चालकांना याचा फायदा होईल. त्यांच्यासाठी वेगळी बँक निर्माण करण्याचा मानस आहे. याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यात याचा फायदा होईल.

## राजिप पाणीपुरवठा विभागात कोट्यवधींचा गैरव्यवहार

### 'सखोल चौकशीनंतर दोषींवर कारवाई होणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या (राजिप)अलिबाग उपविभागातील वरिष्ठ सहाय्यक लिपिक नाना कोरडे याने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींविरोधात गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी माहिती राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी गुरुवारी (दि.१३) पत्रकार परिषदेत दिली.

आतापर्यंत केलेल्या चौकशीत कोरडे याने एक कोटी १९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे उघड झाले आहेत. त्यापैकी ६८ लाखा रुपये कोरडे याने प्रशासनाकडे जाम केले आहेत. नाना कोरडे याने आपल्या विभागातील वरिष्ठ अधिकार्यांची धनादेशांवर बनावट सही करून, पगाराव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी रक्कम परस्पर स्वतः चे खात्यात वळती केली. काही रक्कम पत्नी सोनाली कोरडे हिच्या खात्यातदेखील जमा केले, अशी माहिती डॉ. बास्टेवाड यांनी दिली.

पंचायत राज सेवार्थ प्रणालीच्या माध्यमातून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात येतो. पगार व पगारव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना मिळणारे इतर फरक देण्यासाठी दोन स्तर स्थापन करण्यात आले आहेत. या माध्यमातून पाणीपुरवठा अलिबाग विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन त्यांच्या खात्यात जमा होत होते. (पान २ वर..)




## 'सीकेटी'च्या स्वस्तिका घोषला दुहेरी टेबल टेनिसमध्ये 'सुवर्ण'



**डेहराडून : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राला एक सुवर्ण, एक कांस्यपदक मिळाले. स्वस्तिका घोष व दिया चितळे या जोडीने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला टेबल टेनिसमध्ये महिला दुहेरीचे सुवर्ण पदक जिंकून दिले. त्यानंतर महिला एकेरीच्या संघर्षपूर्ण अंतिम लढतीनंतर महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला रौप्यपदक मिळाले, तर पृथा वर्टीकरला कांस्यपदक मिळाले.

महिला दुहेरीत दिया चितळे व स्वस्तिका घोष या महाराष्ट्राच्या जोडीने निथाया श्री मनी व काव्य श्री बैस्सा या तामिळनाडूच्या चजोडीचा ३- २ (६-११, ८- ११, ११-९, ११- ७, ११- ६) असा पराभव करून सुवर्णपदकावर मोहर उमटवली.

महिला एकेरीच्या अंतिम लढतीत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिने तमिळनाडूच्या सेलेना एस. कडवी लढत दिली. मात्र, टाळता येण्याजोग्या अनेक चुका केल्यामुळे स्वस्तिकाचा पराभव झाला. तमिळनाडूच्या सेलेनाने ही लढत ११-७, ११-२, ६-११, ७-११, ११-७, ११-९ अशी ४-३ ने जिंकून सुवर्ण पदकाला गवसणी घातली. त्याआधी, महिला एकेरीच्या उपांत्य लढतीत महाराष्ट्राच्या पृथा वर्टीकरला तमिळनाडूच्या सेलेना एस. हिने ७- ११, १६- १४, ११- ७, ११- ९, ११- ६ असे ४- १ फरकाने हरविले. त्यामुळे पृथा वर्टीकरला कांस्यपदक समाधान मानावे लागले.

## मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट

**मणिपूर : वृत्तसंस्था**

मणिपूरमध्ये केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. गेल्या आठवड्यातच मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी पदाचा राजीनामा दिला होता.

रविवारी बिरेन सिंह यांनी राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाला मंजुरी देण्यासाठी भाजप नेत्यांच्या बैठका सुरू होत्या. मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांच्या राजीनाम्यानंतर राज्यपाल अजय भल्ला यांनी सोमवारपासून सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशन रविवारी स्थगित केले होते. बिरेन सिंह यांनी एक दिवस आधी पद सोडले होते.

# मोतीबिंदू मुक्त राज्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील -मुख्यमंत्री फडणवीस

## मास्टेक व शंकरा फाऊंडेशन, यूएसए संस्थाचा पुढाकार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याला मोतीबिंदू मुक्त करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासन सदैव प्रयत्नशील आहे. या अनुषंगाने विदर्भातील मास्टेक व शंकरा फाऊंडेशन, यूएसए या संस्था मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनमध्ये शासनाला सर्वोतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेणार आहेत. दरवर्षी साधारण एक लाख मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट असलेल्या या संस्थांचे कार्य कौतुकास्पद आहे. या संस्थाच्या माध्यमातून राज्याला मोतीबिंदू मुक्त करण्यासाठी नक्कीच मोलाचे सहकार्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्य विषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन शासनाने हाती घेतलेल्या या मिशनला २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, शालेय शिक्षण या विविध विभागांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे.

या मिशनची राज्यातील यशस्विता पाहून राष्ट्रीय अंध निवारण कार्यक्रम व धर्मादाय रूग्णालयांचे सहकार्य लाभत आहे. मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्व शासकीय व धर्मादाय रुग्णालयांच्या माध्यमातून मोफत उपचार करण्यात येत आहेत. हे मिशन यशस्वी करण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय व धर्मादाय रुग्णालये मिळून साधारण ३५० ऑपरेशन थिएटर येथे दररोज किमान दहा मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दीष्ट ठेवले होते.

या उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगाने हे मिशन सुरू झाल्यापासून २०१७ ते २०१९ या दोन वर्षांच्या कालावधीत साधारण साडेसतरा लाख व २०२२-२३ यावर्षात साधारण नऊ लाख मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. याचप्रमाणे मार्च, २०२४ अखेर पर्यंत नऊ लाख ४५ हजार ७३३ मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून संबंधित रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर मोफत चष्मे देखील देण्यात आले आहेत. या मिशनमुळे राज्यातील मोतीबिंदू रूग्णांचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होत असल्याचे समाधान ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

शासनाचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन हे ध्येय २०२७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी विदर्भातील मास्टेक आणि शंकरा फाऊंडेशन यांनी दरवर्षाला महाराष्ट्रामध्ये मोफत एक लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि त्यासोबतच इतर आर्थिक मदत ही देण्याचे मान्य केले आहे. यांच्यासोबत दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालय, वर्धा, लता मंगेशकर वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. महात्मे आय हॉस्पीटल, नागपूर, एआयआयएमएस, नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, आयजीएमसी, नागपूर, सुरज आय इन्सस्टीट्युट आणि डॉ. नानगिया आय हॉस्पीटल, नागपूर यासारख्या इतरही वैद्यकीय क्षेत्रातील संस्था मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रदान करण्यासाठी सहभागी असतील.

या संस्था ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचं निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवणे आणि त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील, या विश्वासाने मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या स्वप्नपूर्तीसाठी शासन म्हणून कायम या संस्थांना सहकार्य असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## संरक्षित स्मारकांच्या परिसराचा मंत्री शेलारांकडून आढावा



**पुणे : प्रतिनिधी**

वढू बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीला अभिवादन करून गुरुवारी (दि.१३) पुणे दौऱ्यावर असणारे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी पुणे जिल्ह्यातील राज्य शासन संरक्षित स्मारकांच्या कामांचा बैठक घेऊन आढावा घेतला.

वीर, पराक्रमी वंदनीय छत्रपती संभाजी महाराज यांच्या वढू बुद्रुक येथील समाधी स्थळावर जाऊन माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केले. महाराष्ट्र शासनाने हे पवित्र स्मारक संरक्षित केले असून शासनाच्या पुरातत्व विभागातर्फे या परिसराचा विकास करण्यात येत आहे. या कामाचा मंत्री आशिष शेलार यांनी आढावा घेतला. या वेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक नागरिक व स्मारक समितीचे पदाधिकारी आणि पुरातत्व विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

त्यानंतर पुणे दौऱ्यात आज पुरातत्व विभागाच्या विभागीय कार्यालयात जाऊन त्यांनी पुण्यातील सर्व स्मारक कामांच ।आढावा बैठक घेतली. पुणे जिल्ह्यात ३९ स्मारके राज्य संरक्षित असून यातील तोरणा, राजगडासह अन्य स्मारकांच्या डागडुजीची जी कामे सुरु आहेत त्याचाही आढावा यावेळी घेतला. संचालक तेजस गर्गे, सहाय्यक संचालक विलास वहाने आणि अधिकारी उपस्थित होते.

# महावितरणमधील दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहनांचे वितरण

**कल्याण : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या निर्णयानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी सहायक उपकरणे पुरवण्यात महावितरणच्या कल्याण मंडल-एक कार्यालयाने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१३) दोन कर्मचाऱ्यांना दुचाकींचे वितरण करण्यात आले.

राज्य सरकारी सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरवण्याबाबत सरकारने परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाप्रमाणे मागणी करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना दुचाकी पुरवण्याची प्रक्रिया पूर्ण करून राज्यात प्रथमच कल्याण मंडल-एक कार्यालयाने या उपक्रमात पुढाकार घेतला. दुचाकींचे वितरण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना मुख्य अभियंता मिश्रा म्हणाले, दिव्यांगांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी सहायक उपकरणे महत्वाची ठरणार आहेत. या सुविधेमुळे शारीरिक अपंगत्व असले तरी मनाने खंबीर बनून दिव्यांग कर्मचारी अधिक प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच कल्याण परिमंडलातील इतर कार्यालयांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांना या उपक्रमाचा लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

याप्रसंगी मानव संसाधन विभागाचे सहाय्यक व्यवस्थापक सुशिल पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, प्रहार संघटनेचे अनिल गोसावी, सुप्रिम टीव्हीएसचे अनिल शहाजवाला यांच्यासह कार्यकारी अभियंते, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कल्याण परिमंडलात यापूर्वी चार दिव्यांग कर्मचाऱ्यांना याच उपक्रमांतर्गत दुचाकींचे वितरण करण्यात आले आहे.



## पिकांच्या संरक्षणासाठी शेतात उभारले बुजगावणे

**खोपोली : प्रतिनिधी**



पावसाळा संपताच तालुक्यातील शेतकरी शेतामध्ये कडधान्य तसेच भाजी पाल्यांची लागवड शेतकऱ्यांनी केली असून, ही शेती चांगली बहरली आहे.मात्र शेतात जंगलातले रानटी प्राणी यांची मोठ्या प्रमाणात भीती असते.शिवाय पक्षी हि शेतामध्ये पेरलेल्या कडधान्यांची नासधूस करत असतात.सातत्याने पिकांचे रक्षण करणे हे शेतक-याला शक्य नसते. यामुळे शेतकरी शेतात बुजगावणे उभारतात.

बुजगावणने माणसाप्रमाणे दिसत असल्याने शेतात रानटी पक्षी, प्राणी मोकाट गुरे प्रवेश करीत नाही. त्यामुळे शेतक-याला या बुजगावण्यापासून मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. शेतकरी शेतामध्ये वाल, मुग, हरभरे, मटकी मका त्याचंबरोबर भाजी-पाल्याच्या समवेत कडधान्याला मागणी असल्याने शेतकरी ही दोन्ही पिके हिवाळा या ऋतू मध्ये घेत आहे.

शेतामध्ये शेतकऱ्यांनी पेरलेल्या कडधान्याच्या वासाने शेतकऱ्यांची गुरे तसेच मोकाट गुरे शेतामध्ये प्रवेश करीत असतात आणि पिंकाची नासधूस ही करतात. यामुळे शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावा लागत असतो. भाजी पाल्यांचे नुकसान होवू नये या उद्देशाने शेतकरी पिकांचे संरक्षण म्हणून बुजगावणे उभे करीत आहे.

## कळंबोली मॅकडॉनल्ससमोर टेम्पोची बसला जोरदार धडक

### वाहनात अडकून टेम्पो चालक जागीच ठार

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली मॅकडॉनल्ड्ससमोर टेम्पो आणि बसचा झालेल्या भीषण अपघातात टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

पुण्याहून मुंबईकडे जाणारी बस फ्लायओव्हर जवळ आली असता मागून भरधाव वेगात येणार्या टेम्पोने बसला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, टेम्पो चालक टेम्पोमध्येच अडकून त्याचा जागीच मृत्यू झाला.



पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार टेम्पोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. या अपघाताचा पुढील तपास कामोठे पोलिस करीत आहेत.

कळंबोली मॅकडोनाल्ड जवळील बस स्थानकावरून लांब पल्ल्याची एसटी सेवा सुरू आहे. मात्र खाजगी ट्रॅव्हल्स चालकांनी एसटी बस स्थानकाला लागूनच आपला व्यवसाय थाटलाय. नियमानुसार एसटीच्या थांब्यापासून २०० मीटर अंतरापर्यंत खाजगी वाहतुकीची परवानगी नसतानाही खाजगी ट्रॅव्हल्सकडून येथे दमदाटी आणि गर्दी करण्यात येते. या संदर्भात अनेक तक्रारी वाहतूक पोलीस तसेच आरटीओकडे दिल्या गेल्या आहेत. यावर ठोस उपाययोजना होत नसल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

## आमदार मंदा म्हात्रे यांची सिडको व्यवस्थापकीय संचालकां समवेत बैठक

नवी मुंबई : प्रतिनिधी

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी आज सिडको सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्या समवेत बेलापूर मतदार संघातील विविध प्रश्नांवर बैठक झाली. यामध्ये प्रलंबित असलेल्या विकास कामांचा आढावा घेण्यात आला.




यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक दीपक पवार, विकास सोरटे, मनोहर बाविस्कर, कमळ शर्मा, बलवीरसिंग चौधरी, अशोक नाईक, जयवंत तांडेल, विजय नाईक, जयराम पासवान, महेंद्र नाईक, गणेश पाटील, शरद पाटील, अनंता नाईक, भागेश भोईर, भावेश नाईक, प्रवीण पाटील, रमेश नाईक, तसेच प्रजापती मंदिर, सरस्वती धाम मंदिर, दुर्गा माता मंदिर, सेवालाल मंदिर, राम मंदिर, मंदिराचे विश्वस्त व सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये महिला बाल भवनाची निविदा पूर्ण झाली असून उर्वरित प्रक्रिया करणे, शहरातील सर्व धार्मिक स्थळांचे भूखंड धार्मिक स्थळांच्या दराप्रमाणे संस्थेच्या नावावर करणे व नवीन जे काही छोटे भूखंड आहेत ते धार्मिक स्थळांसाठी आरक्षित ठेवणे, फुलपाखरु उद्यान उभारणेकरिता सारसोळे पामबीच लगत असलेल्या १२ एकर भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण करणे करावे गाव व करावे नगर परिसरातील स्थानिक रहिवाशांकरिता समाज मंदिरासाठी भूखंड उपलब्ध करणे, करावे गाव येथे मासळी मार्केट करिता भूखंड उपलब्ध करणे, दारावे गावाकरिता समाज मंदिरासाठी भूखंड उपलब्ध करणे,

नेरूळ सेक्टर नवीन ५० ई अंतर्गत प्रभाग क्र. १०७ मध्ये ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र तसेच विविध सुविधा पुरविणे आदि प्रश्नबाबत संबंधित अधिकाऱ्यांसमोर चर्चा केली. यावेळी सिडको सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी सकारात्मकता दाखवत सदर प्रश्न लवकरच मार्गी लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

पान १ वरुन

## ‘युवा पर्यावरण संसद’मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

युवा पर्यावरण संसदमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक गंभीर समस्यांवर चर्चा करून उपाययोजना सुचविल्या. या संसदेत जलसंधारण, प्रदुषण नियंत्रण, हरित उर्जा, जंगलतोड आणि कचरा व्यवस्थापन या महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चासत्र झाले. विद्यार्थ्यांनी विविध पर्यावरणीय समस्यांवर आधारित आपली मते मांडली आणि शाश्वत पर्यावरणासाठी उपयुक्त ठरणारे प्रस्ताव सादर केले.

या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. श्री गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.



## ’आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व’ स्पर्धेचा उद्या पारितोषिक वितरण समारंभ

वक्तृत्व स्पर्धेत १६ विद्यालयातील १५ हजार ८९६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यातील बक्षिसपात्र विजेत्यांना लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिकांसाठी ७५०२१००१०० या क्रमांकावर संपर्क साधावा आणि या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी केले आहे.

## राजिप पाणीपुरवठा विभागात कोट्यवधींचा गैरव्यवहार


यामध्ये नाना कोरडे याने कर्मचाऱ्यांना पगारव्यतिरिक्त इतर फरकाची रक्कम दाखवून मागील वर्षभरात सुमारे एक कोटी १९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला. हा व्यवहार आरडीसीसी आणि एसबीआय या बँकेतून झालेला आहे.

नाना कोरडे पुरवठा विभागात कार्यरत होण्याआधी म्हसळा येथे महिला व बालविकास विभागात म्हसळा कार्यरत होता. तेथील कागदपत्रेदेखील तपासण्यात येणार आहेत. हा गैरव्यवहार करताना कोरडे यांने बँकेच्या धनादेशावर अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करून रक्क काढली. त्यामुळे संबंधीत बँकेच्या कर्मचार्यांची देखील चौकशी करण्यात येईल. चौकशी करण्यासाठी उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महादेव टेळे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. ही सामिती एक आठवड्यात आपला अहवाल सादर करेल. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

## दुखवटा

### राघो हातमोडे

**पनवेल :** गिरवले गावातील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भास्कर राघो हातमोडे यांचे वडील राघो वाळकू हातमोडे यांचे ५ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पाच मुली असा परिवार आहे. कै. राघो हातमोडे यांचा दशक्रिया विधी १४ फेब्रुवारी रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे, तर उत्तरकार्य १७ फेब्रुवारीला गिरवले येथे होणार आहे.




### गुलाब शिंदे

**पनवेल :** संत सेवा मंडळाच्या गुलाब अनंत शिंदे (अक्का) यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती अनंत शिंदे, मुलगा जयंत शिंदे व मुलगी अलका पडवळ व सुना नातवंडे असा परिवार असून त्यांचे दहावा शुक्रवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी भोगावती नदी घाट येथे व तेरावे२५ फेब्रुवारी राहत्या घरी शिंदे चाळ येथे होणार आहे.



### डॉ. निशिथ ध्रुव

**धाटाव :** अमृता परिचारिणी हॉस्पिटलचे ज्येष्ठ सर्जन डॉ. निशिथ ध्रुव यांचे बुधवारी रात्री मुंबई येथे दुखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी डॉ. पूर्वी ध्रुव व सुपुत्र डॉ. अभिलाष ध्रुव, सून, नातवंडे असा परिवार आहे. गुरुवारी दुपारी त्यांच्या निवासस्थानावरून निघालेल्या अंत्ययात्रेत वैद्यकीय, औद्योगिक, राजकीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह मोठ्या संख्येने रोहेकर उपस्थित होते. सर्जन क्षेत्रातील ध्रुवतारा गमावला अशा शब्दात भाजपा अध्यक्ष अमित घाग यांनी भावना व्यक्त करुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली



# संगणक व्यवसायातून दहा कोटींची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई उपनगरातील एका व्यावसायिकाची संगणक व्यवसायातून १० कोटी ३० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली. कंपनीचे अधिकारी आणि संचालकांनी ही फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

संगणकाची सुटे भाग विक्री करणारे ४१ वर्षीय संदीप जैन यांनी याबाबत पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, ऑक्टोबर २०१८ ते मे २०१९ या दरम्यान ही फसवणूक झाली. जैन यांना संबंधित कंपनीने केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा पाच राज्यासह नेपाळ या देशात मुख्य वितरक म्हणून नेमणूक करु असे आश्वासन दिले होते. त्यामुळे जैन यांनी त्या कंपनीत १० कोटी ६० लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. यातील २६ लाख रुपये जैन यांना परत केले. मात्र उर्वरित रक्कम १० कोटी ३४ लाख रुपये परत न करता आणि वितरणाचे हक्क न दिल्याने जैन यांनी अनेक महिने कंपनीच्या संचालकांकडे रकमेची मागणी केली. मात्र रक्कम परत न केल्यामुळे खारघर पोलीस ठाण्यात याविषयी गुन्हा नोंदविण्यात आला.

## गाडीच्या काच फोडून मौल्यवान वस्तूंची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

गाडीची काच फोडून गाडीच्या आतील मौल्यवान वस्तूंची चोरी केल्याची घटना पनवेल तालुक्यातील भोकरपाडा परिसरात घडली आहे. राजीवकुमार श्रीवास्तव यांनी त्यांची गाडी जुना मुंबई-पुणे हायवेच्या बाजूला भोकरपाडा येथे उभी ठेवली असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या गाडीची काच फोडून गाडीच्या आतमध्ये असलेले ब्राऊन रंगाची बॅग,

रोख रक्कम, डायरी, चावी, पेन, पासबूक, मोबाईल फोन व इतर महत्वाची कागदपत्रे तसेच स्मार्ट वॉच असा मिळून जवळपास ३२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ५० हजारांच्या दोन बैलांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पन्नास हजार रुपयांच्या दोन बैलांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमा विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अभिदास गायकर हे केवाळे येथे राहत असून त्यांच्याकडे दोन बैल आहेत. दोन्ही बैल संध्याकाळी पालकर यांच्या घराच्या समोर रस्त्याच्या कडेला बांधले होते. त्यानंतर ते जेवण करून झोपी गेले. बैलगाडी घेऊन जाण्यासाठी गेले. यावेळी बैलांचा शोध घेतला, मात्र बैल सापडून आले नाहीत. त्यानंतर ग्रामपंचायतने लावलेले सीसीटीव्ही चेक केले असता बैलाच्या जवळ एक अनोळखी इसम वावरताना दिसला. त्यांनी बैल चोरून नेल्याची खात्री झाल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# प्रणित मोरे हल्लाप्रकरणी पाच जणांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे राहत असलेल्या विनोदवीर प्रणित मोरे याच्यावर सोलापूर येथे (२ फेब्रुवारी रोजी) हल्ला झाल्यानंतर शुक्रवारी (७ फेब्रुवारी) खारघर पोलीस ठाण्यात प्रणीतने दिलेल्या तक्रारीनंतर १० ते १२ जणांविरोधात मारहाण केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी हा गुन्हा सोलापूर येथील पोलिसांकडे वर्ग केला. सोलापूर पोलिसांनी या प्रकरणी पाच जणांना अटक केली.



२ फेब्रुवारी सायंकाळी पावणेसहा वाजता सोलापूर येथील सदर बाजार येथील २४ के क्राफ्ट ब्रुंझ रेस्ट्रॉरन्टमध्ये प्रणीत मोरे याच्या प्रयोगाची तिकीटे खरेदी करून मारहाण करणारी मंडळी या हॉटेलात प्रेक्षक बनून शिरली. प्रणीतवर हल्ला झाल्याच्या वृत्तानंतर शनिवारी भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पनवेलचे भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रणीतच्या खारघर येथील घरी जाऊन त्याच्या प्रकृतीची विचारपूस केली.

कलाकारांवर असे हल्ले होणे निंदणीय असून प्रणीतला सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन प्रदेश कार्याध्यक्ष चव्हाण यांनी प्रणितच्या कुटुंबियांना दिले. त्याच दिवशी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविल्यानंतर सोलापूर पोलिसांना तो वर्ग करण्यात आला.

प्रणितने दिलेल्या तक्रारीमध्ये तन्वीर शेख आणि कौशल शिंदे यांच्या साथीदारांनी हा हल्ला केल्याचे म्हटले होते. अभिनेता वीर पहारिया याचे प्रणीतने हास्य प्रयोगातून विडंबन करून त्याची पोस्ट समाजमाध्यमांवर केल्याचा राग संशयित आरोपींच्या मनात असल्याने त्यांनी हा हल्ला केल्याचे तपासात समोर येत आहे.

# सीकेटी कॉलेजच्या मायक्रोबायोलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयस्तरावर यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित २३व्या नॅशनल मायक्रोबायोलिम्पियाड स्पर्धेत अभूतपूर्व यश मिळवले.



या स्पर्धेत १० विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. देशभरातील ७० महाविद्यालयांतील ३००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा दोन टप्प्यात घेण्यात आली होती. पहिल्या ऑनलाईन फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय विज्ञान संस्थेत ऑफलाइन फेरीत भाग घेतला.

या स्पर्धेत महाविद्यालयातील साशा वैंगणकर हिने मायक्रोबायो पोडीयम मध्ये प्रथम क्रमांक, श्रेया सुनील दळवी हिने तृतीय क्रमांक तर आकांक्षा पाटील हिने आठवा क्रमांक पटकावला. तसेच मायक्रोबायोक्विझ स्पर्धेत द्वितीय वर्षाच्या स्नेहा चौधरी, साशा वैंगणकर आणि सपना यादव यांनी राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांक व मायक्रोबायोकॅनव्हास स्पर्धेत सपना यादव हिने पाचवा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या या भव्य यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील आणि विज्ञान विभाग प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे, प्रा. निलीमा तिदार, प्रा. अर्चना गांधारकर, प्रा. गणेश साठे, प्रा. अन्वेष वेमुला, प्रा. श्वेता हंबरवाडी आणि प्रा. नमिता गरुडे यांनी कठोर परिश्रम घेतले व सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या स्पर्धेतील या घवघवीत यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकुर व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# पनवेलमध्ये संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोहिदास वाडा येथे चर्मकार समाज प्रतिष्ठान रायगडच्या वतीने संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी रोहिदास वाडा येथील समाज मंदिर उभारण्यासाठी विशेष योगदान देणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या प्रती आभार मानत जयंतीचे औचित्य साधून चर्मकार समाजाच्या वतीने विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या वेळी मान्यवरांनी श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांना अभिवादन केले. महिलांसाठी हळदीकुंकू व तसेच प्रसिद्ध बुवा गणपत बुवा म्हात्रे यांच्या भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष विजय मोहोकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी नगरसेविका दर्शना भोईर, रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे माजी अध्यक्ष अरविंद सावळेकर, कामगार नेते संजय भगत, माजी नगराध्यक्ष अ‍ॅड. जगदीश उरणकर, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, रेणुका मोहोकर, पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड गजानन करावकर, विलास मोहोकर, रमाकांत गरुडे, नरेंद्र गायकवाड, विजय गायकवाड, अनिल जाधव, संजय जाधव, अजय जाधव, के. डी. आंबोलकर, लक्ष्मण कल्याणकर, शशिकांत मोहोकर, रामनाथ आंबोलकर, प्रवीण मोहोकर, दिनकर गव्हाणकर, विलास उरणकर, महेंद्र उरणकर, विनायक माने, बाळकृष्ण गरुडे, बाबू कल्याणकर, जीवन उरणकर, मधुकर उरणकर, सुनील सावर्डेकर, किशोर मोहोकर, सुनील मोहोकर, दिनेश भोसकर आदी उपस्थित होते.

संत रोहिदास महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष विजय मोहोकर, प्रवीण मोहोकर, भूषण कल्याणकर, सचिन उरणकर अतिश मोहोकर व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



# तळोजा येथे होणार सिडकोच्या गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत शनिवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी रायगड इस्टेट, फेज १, भूखंड क्र. १, सेक्टर-२८, तळोजा पंचानंद, पनवेल, रायगड-४१०२०८ येथे सकाळी ११.०० वाजता पार पडणार असून सोडतीचे थेट प्रक्षेपण सिडकोच्या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे १२ ऑक्टोबर २०२४ रोजी माझे पसंतीचे सिडकोचे घर गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, खारघर पूर्व (तळोजा), मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटाकरिता २६,००० सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे वैशिष्ट्य होते. अर्जदारांना आपल्या पसंतीच्या १५ सदनिकांचा प्राधान्यक्रम निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या योजनेला अर्जदारांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

माझे पसंतीचे सिडकोचे घर गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत उपरोक्त ठिकाणी शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता पार पडणार आहे. तसेच सोडत प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण https://cidcohomes.com या संकेतस्थळावर देखील करण्यात येणार आहे. अर्जदार सदर संकेतस्थळावर, त्यांच्या सिडको होम खात्यात लॉग इन करून सोडतीचा निकाल घरबसल्या देखील पाहू शकतात. सोडतीमधील सोडतीमधील यशस्वी उमेदवारांची यादी https://cidcohomes.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# बीसीटी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे 'उडान'मध्ये सुयश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या जीवनभर शिक्षण आणि विस्तार विभागाने आयोजित केलेल्या उडान वार्षिक महोत्सव - आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भागुबाई चांगु ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपले उत्कृष्ट प्रदर्शन सिद्ध केले आहे. हा कार्यक्रम १२ फेब्रुवारी रोजी विठ्ठलवाडी-कल्याण येथील वेदांत विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.

या वर्षीच्या कामगिरीमुळे सलग पाचव्यांदा या प्रतिष्ठित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे, ज्यामुळे अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाची त्यांची प्रतिष्ठा आणखी मजबूत झाली आहे.उल्लेखनीय कामगिरीमध्ये खालील कामगिरींचा समावेश आहे: संघाची सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव अधोरेखित करणाऱ्या त्यांच्या आकर्षक स्ट्रीट प्लेसाठी ट्रॉफी आणि प्रमाणपत्रांसह उत्तेजनार्थ बक्षीस आणि द्वितीय वर्षाच्या बीए, एलएलबीच्या विद्यार्थिनी श्रावणी मोकल यांनी वक्तृत्वात तिसरे स्थान आणि कांस्यपदक मिळवले.

विद्यार्थ्यांना प्राचार्य श्रीमती सानवी देशमुख आणि प्रभारी प्राध्यापक संग्राम पवार यांचे मार्गदर्शन होते. ज्यांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली.

## नायजेरियन नागरिकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

व्हिसाची मुदत संपली असतानाही तळोजात वास्तव्य करणार्या नायजेरियन नागरिकाला तळोजा पोलिसांनी अटक केली.

तळोजा पाचनंद येथील सेक्टर २६ मधील स्प्रिंगवूड इमारतीमध्ये ४३ वर्षीय ओझोमबेची फॅबीयन हा राहत असल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तो राहत असलेल्या सदनिकेत जाऊन त्याची चौकशी केल्यावर ही बाब स्पष्ट झाली. त्यानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, पनवेल परिसरात असणाऱ्या नायझेरियन नागरिकांचा शोध सुरू आहे.

# सायबर फ्रॉड व नवी मुंबई व्हॉटसअॅप चॅनेलबाबत मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

नवीन कायदा व सायबर जनजागृती कार्यक्रमांतर्गत पनवेल शहर पोलिसांतर्फे इंडियन कोस्ट गार्डचे अधिकारी व कर्मचार्यांना नवीन कायदा सायबर फ्रॉड व नवी मुंबई व्हॉटसअप चॅनेल बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अ‍ॅड.सचिन पटेल यांनी उपस्थितांना नवीन कायद्याविषयक मार्गदर्शन केले. तर पो. निरिक्षक शाकीर पटेल यांनी पोलीस जनता समन्वयक मार्गदर्शन केले. तसेच सायबर गुन्हे मार्गदर्शन व व्हॉटसअप चॅनेल याचे मार्गदर्शन पो.उपनिरीक्षक अभय कदम यांनी केले. तसेच यावेळी उपस्थित केलेल्या शंकांचे निरासनसुद्धा केले.




# पनवेल तालुक्यातील आठ गावांत वितरित होणार ६१९ मालमत्ता कार्ड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढती लोकसंख्या, विकासाच्या विविध योजना आणि जमीन हस्तांतरणाचा वाढलेला वेग पाहता गावठाणाचे अभिलेखे अद्ययावत करण्याच्या दृष्टीने केंद्राच्या स्वामित्व योजनेतंर्गत ग्रामविकास, महसूल आणि भूमी अभिलेख विभागाने राबविलेल्या उपक्रमातंर्गत पनवेल तालुक्यात आठ गावात ६१९ मालमत्ता कार्ड (प्रॉपर्टी कार्ड) वितरित केले जाणार आहेत.

स्वामित्य योजने अंतर्गत २०२३ मध्ये या गावांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात आले होत.पहिल्या टप्प्यात आठ गावांची निवड करण्यात आली असून यामध्ये भोकरपाडा,वाजेपुर,दहिवली,कसलखंड या चार गावात दि.२२,२४ आणि २५ या तारखेला प्रॉपर्टी कार्ड वितरित केले जाणार आहेत.याव्यतिरिक कालीवली,सवणे,मानघर आणि पारगाव - डुंगी या गावात दुसऱ्या टप्प्यात हे मालमत्ता कार्ड वितरित केले जाणार आहेत.

ब्रिटिशकालानंतर प्रथमच स्वामित्व योजने अंतर्गत हे कार्ड वितरित केले जात आहेत.या प्रॉपर्टी कार्डचा उपयोग



### ५४४ खासगी मिळकती

**आठ गावात वितरित केल्या जाणाऱ्या प्रॉपर्टी कार्ड धारकांची संख्या ६१९ एवढी आहे.या मालमत्ता कार्ड धारकांपैकी ५४४ खाजगी मिळकती असणार आहेत.तर उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांची मिळकत आहे.**

भविष्यासाठी होणार आहे.डिजिटल नकाशे तसेच या प्रॉपर्टी कार्डच्या आधारे बँकेकडून कर्ज देखील घेता येणार आहे.

सर्व्हे ऑफ इंडियाकडून सर्व मिळकतींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण होऊन जीएसआय डेटा (नकाशातील मिळकती) ग्रामपंचायतीच्या मिळकत रजिस्टरशी जोडण्यात येऊन त्यावर आधारीत हे डिजीटल मिळकत पत्र तयार करण्यात आले आहेत.

# दीड महिन्यानंतर दोषींवर गुन्हा दाखल

## सृष्टी शिदच्या कुटुंबाना मिळाला न्याय

**उरण : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील तामसई येथील सृष्टी राजू शिद ही उरण तालुक्यातील चिरनेर आदिवासी आश्रम शाळेत शिकणार्या सृष्टी शिदच्या मृत्यू प्रकरणी चिरनेर आश्रमशाळेतील मुख्यध्यापक, अधीक्षक व शिक्षकांवर दीड महिन्यानंतर गुन्हे दाखल करण्यात आल्याने सृष्टीच्या कुटुंबाना न्याय मिळाला आहे.



पनवेल तालुक्यातील तामसई येथील सृष्टी राजू शिद ही उरण तालुक्यातील चिरनेर आदिवासी आश्रमाशाळेत इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकत होती. अचानक तिच्या पोटात दुखायला लागले. सृष्टी आणि तिच्या मैत्रिणींनी शिक्षकांना सांगितले. मात्र, त्यांनी दुर्लक्ष केले. नंतर काही तासाने सृष्टीला उपचारासाठी पनवेल येथे नेण्यात आले. सृष्टी शिदचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

व्यवस्थापकीय मंडळीनी जर वेळेत सृष्टीवर उपचार केला असता तर तिचा जीव वाचला असता, असा आरोप पालकांनी करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा यासाठी सृष्टीचे आई वडील आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनला अनेक पत्र दिले, मात्र गुन्हा दाखल झाला नाही.

शेवटी आई वडिलांनी पोलीस उपायुक्त, परीमंडळ २ कार्यालयासमोर उपोषण मंगळवार (दि. ११ ) रोजी उपोषणाला सुरुवात करताच सहायक पोलीस आयुक्तांनी दखल घेतली.

यावेळी पत्रकार गणपत वारगडा, लक्ष्मण शिद, सृष्टीचे आई वडील शोभा राजू शिद त्यांचे नातेवाईकांसह तात्काळ उरण पोलीस स्टेशनमध्ये गेले. आणि सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास चिरनेर आदिवासी आश्रमाशाळेतील मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे, अधीक्षक सतीश मोरे, शिक्षक महादेव डोईफोडेसह इतर शिक्षक आणि स्टाफवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, उप निरीक्षक साबळे अधिक तपास करीत आहेत.

## संपादकीय

# मदतीचा अतिरेक नको

दारिद्र्यरेषेखालील लोकांना मदतीचा हात देऊन त्यांना उत्तम दर्जाच्या जीवनाच्या मार्गावर आणून सोडणे हे कल्याणकारी सरकारचे कर्तव्यच असते, परंतु अलीकडे बोकाळलेल्या रेवडी-वाटपाकडे निर्देश करीत सर्वोच्च न्यायालयाने, आपण परजीवींचा वर्ग तयार करीत आहोत का असा प्रश्न केला आहे. सर्वच राज्यांतील सत्ताधाऱ्यांनी याचा विचार करायला हवा.

**निवडणुकीच्या तोंडावर विविध मोफत सुविधा जाहीर करण्याबाबत राजकीय पक्षांची अहमहमिका लागत आहे याचे दर्शन नुकत्याच पार पडलेल्या नवी दिल्ली विधानसभा निवडणुकांमध्ये चांगलेच घडले. तिथला कुठलाच महत्त्वाचा पक्ष याला अपवाद नव्हता. सर्वच राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी आसुसलेले असतात. त्यासाठी मतदारांना निरनिराळ्या मोफत योजनांद्वारे प्रभावित करण्याची प्रथाही जुनीच आहे. दक्षिणेकडील राज्यांपैकी तामिळनाडूमध्ये जयललिता यांच्या कार्यकाळात हे मोठ्या प्रमाणात पहायला मिळाले. साड्यावाटपापासून ते अम्मा किचनमधील अत्यल्प दरातील पोटभर जेवणापर्यंत आपल्या दातृत्वाने त्यांनी तेथील जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवले. अलीकडच्या काळात दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन झाल्यापासून जनतेवर मोफत योजनांची लयलूट करण्यासाठी सरकारी तिजोरी खुली करण्याचा अधिक लक्षवेधी कालखंड सुरू झाला. यात जनतेच्या कल्याणाचा हेतू किती होता आणि लांगुलचालनाचा इरादा किती कुणास ठाऊक? भारतासारख्या देशात गरिबी आणि सामाजिक-आर्थिक विषमता मोठी आहे. देशातील तळागाळातील जनतेच्या हिताचा विचार संविधानातही अनेक बाजूंनी केला गेला आहे, परंतु अलीकडच्या काळातील बोकाळलेल्या रेवडी-वाटपाकडे निर्देश करीत सर्वोच्च न्यायालयाने गरजू नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे अधिक चांगले नाही का, असा प्रश्न केला. या लोकांना देशाच्या विकासाचे वाटेकरी करण्याचे सोडून आपण परजीवींचा वर्ग तयार करीत आहोत का, अशी टिप्पणी न्या. भूषण गवई यांनी बुधवारी केली. शहरांमधील बेघर व्यक्तींसाठी निवारा केंद्र सुरू करण्याबाबत दाखल याचिकेवर सुनावणी सुरू असताना न्या. गवई यांनी या देशभर पसरत चाललेल्या या प्रथेकडे लक्ष वेधले. न्या. गवई हे महाराष्ट्रातील असल्यामुळे की काय, त्यांनी महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केला. लाडकी बहीण किंवा अन्य योजनांमधून फुकट दिल्या जाणाऱ्या वस्तू व आर्थिक मदतीमुळे लोकांना काम करण्याची इच्छा होत नाही असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. यावर एका याचिकाकर्त्याचे वकील प्रशांत भूषण यांनी, काम उपलब्ध असेल तर ते करण्याची इच्छा नसलेले लोक देशात फारच कमी असतील असा सूर लावला. त्यांच्या या उद्गारांनंतर न्या. गवई यांनी त्यांना काहिशा तिखट शब्दांत सुनावले. महाराष्ट्रात निवडणुकीपूर्वी झालेल्या मोफतच्या घोषणांमुळे शेतमजूर मिळेनासे झाले आहेत असे ते म्हणाले. वास्तविक देशभरात सगळीकडेच शेतमजुरांची संख्या कमी होण्याची अनेक कारणे आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे अधिक चांगल्या उपजीविकेच्या शोधात ग्रामीण भागातून शहरांकडे लोंढे जात असतात. मोफत रेशन, कोणतेही काम न करता सरकारकडून मिळणारे पैसे ही कारणेही शेतमजूर उपलब्ध न होण्यामागे आहेत का कसे हे पहावे लागेल, परंतु रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा मोफत काहीही देण्यापेक्षा निश्चितच अधिक चांगला पर्याय आहे. गोरगरिबांना शालेय शिक्षण आणि आरोग्यविषयक सुविधा मोफत देण्याला सहसा कुणाचा विरोध नसतो, परंतु सारेच मोफत उपलब्ध करून दिल्यास निश्चितच त्याचे नकारात्मक परिणाम संभवू शकतात. मोफत योजनांचा अतिरेक निश्चितच टाळला जायला हवा.**

# जिल्ह्यातील तरुण उद्योजकांबात बँका उदासीन



खबरबात
प्रकाश सोनवडेकर

तरुणांनी उद्योजक क्षेत्रात प्रगती करावी यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना शासनातर्फे राबवली जात आहे. मात्र बँकांच्या उदसिनतेमुळे तरूणांच्या पदरी निराशा पडत आहे. बँकांकडून कर्जांचे प्रस्ताच मंजूर होत नसल्यामुळे तरूण उद्योगांकडे वळत नाहित. रायगड जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राकडे पंधराशे अर्ज विविध व्यवसाय करण्यासाठी आलेले आहेत. यापैकी ३१० अर्ज मंजूर करण्यात आले असून दीडशे जणांना १० कोटींचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहेत. रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचे एक हजाराचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. ते पूर्ण करण्यासाठी बँकांनी आपल्या धारेणात बदल केला पाहिजे.

रायगड जिल्ह्यातही अनेक तरुण उद्योजक होण्यासाठी धडपड करीत आहेत, मात्र शासकीय योजनेतून कर्ज घेताना बँकाचे पाठबळ मिळत नाही. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत पंधराशे अर्ज कर्ज मंजुरीसाठी बँकांकडे पाठविले आहेत. यापैकी फक्त ३१० अर्ज मंजूर झाले असून १५० जणांना कर्ज वाटप बँकातर्फे करण्यात आलेले आहे. कागदांची अपूर्तता हे त्यामागील एक कारण आहे.

रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचे एक हजाराचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. शासनाने राज्यातील युवक, युवतींना स्वयं रोजगारातून स्वतची व दुसर्याची उन्नती व्हावी या उद्देशाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबवली जात आहे. या योजने अंतर्गत उत्पादन उद्योग, सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषिवर आधारित उद्योग, ई वाहतूक व्यवसाय, फिरते विक्री केंद्र व्यवसाय करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. प्रक्रिया व निर्मिती व्यवसायासाठी कमाल ५० लाख, व सेवा उद्योग प्रवर्गातील प्रकल्पासाठी कमाल २० लाख रुपये कर्ज रुपात दिले जातात.

रायगड जिल्ह्यातील युवक युवती ही उद्योजक होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज करीत आहेत. आतापर्यंत दीड हजार तरुणांनी विविध व्यवसायासाठी अर्ज केले आहेत. यापैकी ३१० अर्ज बँका कडून कर्जासाठी मंजूर करण्यात आलेले आहेत. ३१० पैकी १५० जणांना बँकेकडून १० कोटी कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. १६० जण अजूनही कर्ज वाटपाच्या प्रतीक्षेत आहेत. १२०० अर्ज अजून प्रलंबित आहेत.

गृह कर्ज, वयक्तिक कर्ज, वाहान कर्ज, तारण कर्ज असेल तर बँका त्वरित कर्ज मंजूर करतात, मात्र बँकांकडून शासकीय योजना मधून कर्ज देताना हात आखडता घेत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. रायगड जिल्ह्यातील होतकरू युवक युवती शासनाच्या योजनेचा लाभ घेत असली तरी बँकांचा हातभार कर्जासाठी मिळत नसल्याने उद्योजक होण्याची स्वप्ने धुळीस मिळत आहेत.

नोकरी मिळत नसल्यामुळे तरूणांनी उद्यागाधंद्याकडे वाळावे यासाठी त्यांना प्रात्साहन देण्यासाठी सरकार अनेक योजना राबवत असते. सुरूवातीचे भाडवल उभे करण्यासाठी बॅकांकडून कर्ज मिळवून देण्यासाठी कमी व्याजदामध्ये कर्ज उपलबध्द करून दिले जाते. या योजना राष्ट्रीयकृत बँकाकडूनच राबविण्यात येता. खाजगी बँकांमधून व्याज जास्त आकारले जाते म्हणून कुणी त्यांच्याकडू कर्ज घेण्यासाठी जात नाही. राष्ट्रीयकृत बँककडे कर्ज मागण्यासाठी गेल्यावर तेथे उदासिनता पहावयाला मिळते. कागदपत्रांची पूर्तता करण्यातच माणूस थकून जातो. या सर्व बँकांच्या शाखा जरी रायगड जिल्ह्यात असल्या तरी त्यांना कर्ज मंजूर करण्याचे अधिकारी नाहित. सर्व बँकांची मुख्यालये मुंबईत किंवा पुण्यात आहेत. स्थानिक शाखतून आलेले प्रस्ताव पुढे मुख्यालयात जातात. तेथे ते नामूजर केले जातात.

सहाकरी बँका व पतसंस्थांमध्ये वैयक्ती ओळख असल्यामुळे कमी गादत्रांमध्येदेखील कर्ज मिळते देतात, परंतु त्यांना कर्ज देण्यात मार्यादा आहेत. आम्ही कर्ज देण्यास तयार आहोत. तसा प्रयत्न देखील केला परंतु सरक ार त्याला परवानगी देत नाही, असे सहाकर क्षेत्रात काम करणाऱ्यांनी सांगितले. अनेकदा तरूण उद्याजक खाजगी बँका , सहकारी पतसंस्था किंवा सहकारी बॅकांमधून कर्ज घेतात. परंतु या बँकांचे हप्ते त्यांना परवडत नाहीत. त्यामुळे कर्ज फेडता येत नाही. तो कर्जांत डूबून जातो. तरूण उद्योजकांना कर्ज देण्याच्या राष्ट्रीयकृत बँकांच्या धारेण्यात बदल करावा लागेल. कर्ज कमी कागदात, कमीतकमी वेळेत, कमी व्याजदारात सहज कसे उपलबध्द करता येईल याबात विचार करावा लागेल. काही प्रकरणे मंजूर केलेली असतात. जी काही प्रकरण मंजूर केली जातात ती प्रकरण पुढे संबधीत खात्याकडे जातात. त्यावर हे खाते निर्णय घेते. अशी बरीचशी प्रकरणे या खात्यांकडे पडून आहेत. संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष घातल तर या फाईल जागच्या हलतील. भविष्यात रायगड जिल्ह्यात मोठे प्रकल्प येणार आहेत. त्याअनुषंगाने काही उद्याग रायगड जिल्ह्यात स्थानिक तरूण सुरू करणार असतील तर त्यांना वेळेत कर्ज मिळाले पाहिजे.

# प्रभावी संसदपटु सुषमा स्वराज



अमोघ वक्तृत्व, प्रभावी संसदपटू, कुशल प्रशासक म्हणून सुषमा स्वराज यांनी भारतीय जनतेच्या मनावर राज्य केले. सुषमा स्वराज यांचा जन्म हरियाणाच्या अंबाला येथे १४ फेब्रुवारी १९५२ मध्ये झाला. १९७० मध्ये त्यांनी अभाविप या संघटनेच्या माध्यमातून राजकीय प्रवासाला सुरुवात केली. त्यांनी पंजाब विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली होती.

कायद्याचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी १९७३ साली सर्वोच्च न्यायालयात वकिली सुरू केली. १९७५ साली स्वराज कौशल यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. स्वराज कौशल हे देखील सर्वोच्च न्यायालयात वकील होते. सुषमा स्वराज यांची राजकीय कारकिर्द अतिशय संघर्षशील आणि थक्क करणारी आहे. १९७७ मध्ये त्या पहिल्यांदा हरियाणाच्या विधानसभेत गेल्या. २५ व्या वर्षी कॅबिनेट मंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. ८० च्या दशकात भाजपात सामील झाल्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. १९९० साली त्या राज्यसभेच्या सदस्या झाल्या. १९९६ साली अटलबिहारी वाजपेयींच्या १३ दिवसांच्या सरकारमध्ये त्या माहिती व प्रसारण मंत्री होत्या. याच काळात त्यांनी लोकसभा व राज्यसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याचा निर्णय घेतला. १९९८ मध्ये त्या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री बनल्या. १९९९ मध्ये त्यांनी कर्नाटकातून काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याविरोधात निवडणूक लढवली, मात्र त्या पराभूत झाल्या. २००९ साली त्या मध्य प्रदेशमधील विदिशा मतदारसंघातून लोकसभेवर गेल्या. या वेळी लोकसभेत विरोधी पक्षनेत्या म्हणून त्यांनी काम पाहिले. २०१४ साली विदिशा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर त्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात पहिल्या पूर्णवेळ महिला परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्ती झाली. परराष्ट्र खात्याच्या कामाला त्यांनी तंत्रज्ञानाची जोड देत ट्विटरच्या माध्यमातून या खात्याचे प्रभावी असे कामकाज केले. ज्याची आजही आठवण काढली जाते. असंख्य लोकांच्या समस्या त्यांनी ट्विटरच्या माध्यमातून सोडवल्या. ६ ऑगस्ट २०१९ रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# सावधान, 'डीपसिक'चा डेटा जातोय थेट चीनला?




चिनी एआय चॅटबॉट डीपसिक वापरणे सुरक्षित आहे की नाही? याबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत. त्याबद्दल जाणून घ्या...

चिनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चॅटबॉट 'डीपसिक'मध्ये संशयास्पद कोड सापडला असून हा कोड थेट एका चिनी दूरसंचार कंपनीशी जोडलेला असल्याचे आढळून आले आहे. याद्वारे हा चॅटबॉट त्याला उपलब्ध झालेली माहिती थेट चीनला पाठवू शकतो, असा संशय आहे.

एका वृत्तानुसार हा संशयास्पद कोड डीपसिकच्या वेब क्लायंटवर नोंद केलेला डेटा चिनी मोबाइलपर्यंत पाठविण्यास सक्षम असू शकतो. हा कोड डीपसिक प्लॅटफॉर्मवर खाते तयार करताना तसेच लॉगिन करतानाच्या प्रक्रियेशी संबंधित आहे.

डीपसिक चीनमध्ये काही डेटा पाठवीत आहे का, याबाबत मात्र कोणतीही विश्वासार्ह माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. संशोधक मात्र ही शक्यता नाकारायला तयार नाहीत. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात चिनी कंपनीवर अमेरिकेने २०१९मध्येच बंदी घातली होती.

'डीपसिक'वर ऑस्ट्रेलिया, इटली आणि तैवान या तीन देशांनी सुरक्षेच्या कारणास्तव बंदी घातली आहे. ऑस्ट्रेलियाने डीपसिकला सरकारी यंत्रणा वापरण्यास बंदी घातली आहे.

इटलीने डीपसिकच्या सेवा ब्लॉक केल्या आहेत. आयर्लंडच्या डाटा सुरक्षा आयोगाने डीपसिककडे डाटा सुरक्षा धोरणाचा अहवाल मागविला आहे. युरोपीय देशही नजर ठेवून आहेत.

कुणी शोधला कोड? : डीपसिकमधील हा कोड कॅनडामधील सायबर सुरक्षा संस्था 'फेरुट सेक्युरिटी'ने शोधून काढला आहे.

अनेक स्वतंत्र तज्ज्ञांनी फेरुटच्या दाव्यास पुष्टी दिली आहे. डीपसिक चॅटबॉट टिकटॉकपेक्षाही अधिक घातक असू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# मराठी कवयित्री संजीवनी मराठे



निमित्त

विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनींचा जन्म पुण्याचा. शिक्षणही पुण्यातच झाले. महिला विद्यापीठाच्या जीए व एमए पदव्या त्यांनी संपादन केल्या. शाळकरी वयातच त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. या रचनांचा काव्य-संजीवनी (१९३२) हा त्यांचा पहिला संग्रह असला तरी संजीवनींची रसिकांना खरी ओळख झाली ती राका (१९३८) या संग्रहातून (काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रत केलेली आहे).

यानंतरची संजीवनींची कविता संसार (१९४३), छाया (१९४९), चित्रा (१९५७) व चंद्रफुल (१९५१) या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाली आहे. भावपुष्प (१९५१) व परिमला (१९५९) हे त्यांचे गीतसंग्रह. संजीवनी (१९७६) हा त्यांच्या निवडक कवितेचा संपादित संग्रह तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक (१९७६) ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होते.

संजीवनींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरणमंडळाने निर्माण केलेले काव्यगाय नास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून संजीवनींची कविता गेय रूपात अवतरली आणि त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांत्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती तसेच शब्दकळा, आविष्काराचे वळण यांचा संजीवनींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे, मात्र तांब्यांप्रमाणे त्यांची प्रतिभा नाट्यगीतानुकूल नाही तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता, त्याची परंपराही संजीवनींच्या कवितेत पृथगात्य स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता तिच्या अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे' हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी संजीवनींची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. भावविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची 'एक सानशी कळशी' (छाया)सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेली की, त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते, हे राष्ट्रप्रेमाचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या रचनेतून स्पष्ट होते.

संजीवनींच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धता, वात्सल्यादी स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्याप व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असे असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व राखले आहे, हे महत्त्वाचे होय. महाराष्ट्र शासनाने बरं का गं आई (१९६२) व हसू बाई हसू (९१६३) या त्यांच्या संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. **–सुधा जोशी**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# आरोग्याबाबत खूप काही सांगतात नखं, जाणून घ्या..



बोटांची नखं हाताचं सौंदर्य वाढवतात, सोबतच नखांवरून शरीराच्या आत काय सुरू आहे हेही माहीत पडतं. नखं काही आजारांचे संकेतही देतात. त्यामुळे या संकेतांकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकतं. याबाबत न्यूट्रिशनिस्ट किरण कुकरेजा यांनी माहिती दिली आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पोस्ट करून त्यांनी सांगितलं की, नखांवर कोणकोणत्या आजारांची माहिती मिळू शकते. या समस्या लाइफस्टाईलच्या काही चुकांमुळे होऊ शकतात. चला तर जाणून घेऊ नखं आरोग्याबाबत काय सांगतात.

न्यूट्रिशनिस्टनुसार नखांवर दिसणारे पांढरे डाग किंवा स्पॉच्स कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे होऊ शकतात. त्याशिवाय शरीरात व्हिटॅमिन डी ची कमतरता आणि आयर्नची कमतरता किंवा थायरॉइड डिसऑर्डर झाल्यावरही नखांवर पांढरे डाग येतात.

जर तुमची नखं सहजपणे तुटक असतील किंवा त्यांना भेगा पडत असतील तर हा शरीरात व्हिटॅमिन बी६, मॅग्नेशिअम किंवा व्हिटॅमिन बी १२ कमी असल्याचा संकेत असू शकतो.

कमी प्रोटीन असलेली डाएट घेतल्यानं नखं मुलायम आणि ड्राय होऊ शकतात. त्याशिवाय लिव्हरमध्ये काही समस्या असल्यावर नखांवर अशाप्रकारचे संकेत दिसतात.

ऑक्सिजनची कमतरता किंवा फुफ्फुसं व हृदयासंबंधी समस्या असल्यावर नखं निळे किंवा जांभळ्या रंगाचे दिसू शकतात. अशात तुमची नखं जर निळ्या किंवा जांभळ्या रंगाचे दिसत असतील तर वेळीच डॉक्टरांना संपर्क करा.

शरीरात आयर्न कमी झालं असेल तर नखं पिवळ्या रंगाची आणि चमच्याच्या आकाराची दिसू शकतात. जर नखं आतल्या बाजूनं वाकलेली असतील तर शरीरात आयर्न कमी असू शकतं.

नखं जर पिवळ्या रंगाची दिसत असतील तर लिव्हरसंबंधी समस्या आणि फंगल आजारांचा संकेत असू शकतो. जर नखं पिवळ्या रंगाची दिसत असतील तर जराही वेळ न घालवता डॉक्टरांना संपर्क करा.

# महिलांना आर्थिक साक्षर करणे महत्त्वाचे -मंत्री आदिती तटकरे



मुंबई : प्रतिनिधी

गरजू महिलांना उद्योगपूरक साधने पुरविण्याच्या सहाय्यासोबतच उद्योग कायम टिकविणे आणि वाढविणे यासाठी आर्थिक साक्षरही करावे, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

जीवनाची पुनर्कल्पना करणे : शक्ती समृद्धी या कार्यक्रमाअंतर्गत १५७ महिलांना चर्चगेट येथील वालचंद हिराचंद हॉल येथे उद्योगपूरक वस्तुंचे वितरण महिला व बालविकास मंत्री तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक अनु अग्रवाल, बॉबकार्डचे (बँक ऑफ बडोदाची उपकंपनी) व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र राय, मानव संसाधन प्रमुख रवी खन्ना, सीएसआरचे विभागीय अधिकारी विपुल बरोट, युनायटेड वे मुंबईचे उपाध्यक्ष अनिल परमार, मुख्य कार्यकारी अधिकारी सना शेख, व्यवस्थापकीय सहायक चिन्मय पाटील यांच्यासह अधिकारी आणि महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, व्यावसायिक शिक्षण आणि उद्योग उभारणीस इच्छुक असलेल्या महिलांना आर्थिक परिस्थिती अभावी उद्योग सुरू करता येत नाही. अशा महिलांना बॉबकार्ड उद्योगपूरक वस्तु देऊन त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास सहकार्य करीत आहे. यानंतर त्यांना प्रशिक्षण देणेही महत्वाचे आहे, त्यांना भविष्यात उद्योगवाढीसाठी आर्थिक साक्षर करणे, गुंतवणुकीचे आणि बचतीच्या पर्यायांची माहिती देणे महत्त्वाचे असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

या अंतर्गत या १५७ महिलांना पुढील सहा महिने व्यवसाय कौशल्य, उद्योजकता याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. बॉबकार्ड आणि युनायटेडचे मुंबई यांनी गरजू महिलांना उद्योगपूरक वस्तुंच्या वितरणाबाबत महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी अभिनंदन केले.

# सिडको पाईपलाईनबाधित बेलवडे ग्रामस्थांना भरपाई मिळणार; आमदार रविशेठ पाटील यांचा पुढाकार



पेण : प्रतिनिधी

बेलवडे गावच्या हद्दीत सिडकोच्या पाईपलाइनसाठी बोगद्याचे काम सुरु असून त्यातुन निघणारे दूषित पाणी हे शेतकऱ्याच्या शेतीत सोडण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. त्या शेतकऱ्यांना भरपाई मिळवी अशी मागणी बेलवडे सरपंच हरेश पाटील व सदस्यांनी शासनाकडे केली.

शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रांत अधिकारी प्रविण पवार, युवा नेते वैकुंठ पाटील, मेघा इंजिनिअरिंग कंपनीचे अधिकारी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बेलवडे सरपंच हरेश पाटील, मा.जि.प. सदस्य डी.बी. पाटील, किरण पाटील, हरेश पाटील, वामन पाटील, दत्तात्रेय ढमढेरे, चिंधू पाटील, मारुती पाटील, भालचंद्र पाटील, मोहन पाटील, एल.के. पाटील, तानाजी पाटील आदींसह गावातील युवक वर्ग उपस्थित होते.

या वेळी शेतकऱ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी, गावाला सिडकोतर्फे पाण्याचा टॅब मारू देण्यात यावा, तडे गेल्या घरांना नुकसान भरपाई मिळावी, भविष्यात कोणतेही बोरिंगचे पाणी गेल्यास ती बोरवेल पुन्हा मारून पाणी लागेपर्यंत सर्व खर्च सदर कंपनी करणार आहे व आता ज्या बोरवेलचे पाणी गेले आहे त्याचेदेखील योग्य तो मोबदला देऊन बोरवेल मारून देणार असल्याचे कंपनी प्रशासनाने मान्य केले आहे.

सीआरएस फंड अंतर्गत गावातील विविध विकासकामे करून मिळावी, मुंगोशी फाट्यावरील जो पाईप टाकला आहे तो पाईप आरएमसी मिक्सरच्या मटरेलने बुजवून देऊन मोरी बांधून मिळावी आदींसह अनेक कामाबाबत कंपनी प्रशासन सोबती सकारात्मक चर्चा झाली यावेळी कंपनीच्या वतीने लेखी स्वरूपात पत्र द्यावे असे आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले.

या वेळी केतन पाटील, जितेंद्र पाटील, प्रवीण पाटील, भानुदास पाटील, अक्षय पाटील, प्रसाद पाटील, विजय पाटील, भास्कर चव्हाण, हेमंत चव्हाण, सुभाष पाटील, हेमंत पाटील व अनिल कचरे उपस्थित होते.


## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री. अजित अशोक कदम, पत्ता : रा. गुरुकृपा आशिष बिल्डिंग बी विंग रुम नं - ७०२, खांदा कॉलनी से.१७ पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

माझेकडून खांदा कॉलनी पनवेल येथे प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी खांदेश्वर शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ००६९/२०२५ दिनांक. १२/०२/२०२४५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. गुरुप्रेम सोसायटी प्लॉट नं १९ से. ८ खांदा कॉलनी बिल्डींग मधील शॉप नं ६ चे शेअर सर्टिफिकेट नं. १४३६- (सर्टिफिकेट ५ नंबर २१-२५) वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९३२३५७६३९० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**दिनांक :- १४/०२/२०२५**

**सही/-**
**अजित अशोक कदम**
**खांदा कॉलनी, पनवेल**


# माणगावमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१२) यावेळेत वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन १२७ रुग्णांची तपासणी करून ३७ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबिर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.

शिबिर यशस्वीरी करण्यासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ.श्रुती मोहम, अक्षता पार्टे, निशा शिंदे,जयश्री महाले, रामदास पवार यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पनवेल, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली मिळकत, विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, सदर गाळा मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**गाळयाचे वर्णन :**

**कसबे पनवेल, तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं.६०६/ब, ६०७,६०८ व ६१० या भुखंडावर बांधणेत आलेली ''राधा हरी निवास कॉम्प्लेक्स,'' गाळा क्र. ०४, तळ मजला, क्षेत्रफळ ३३.१६६ चौ. मी. कारपेट लॉफ्टसह (३९.८१ चौ.मी., बिल्टअप ३.७१६ चौ. मी. ओट्यासह)**

वरील गाळा मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १३/०२/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए, एल.एल.बी.**
**( खरेदीदाराचे वकिल)**


# संत रोहिदास महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंतीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत होता. तालुक्यातील नढाळ, खालापूर आणि साजगावमध्ये जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.

संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. खालापूर तालुक्यातील नढाळ, खालापूर आणि साजगावमध्ये जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नढाळमध्ये खालापूर तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष बाबू पोटे यांच्याहस्ते रोहिदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी बाबू पोटे यांनी मनोगत व्यक्त करत उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. जेष्ठ सल्लागार अनिल खालापूरकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

खालापूर आणि साजगावमध्येही जयंती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. भजन, प्रवचन, हळदी कुंकू, महिलांचे मनोरंजनाचे कार्यक्रम आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले आहे.

या वेळी तालुका चर्मकार संघटनेचे पदाधिकारी गजानन बोंबे, किशोर जाधव, सुनील भोईर, नरेश भोईर, भास्कर भोईर, संदीप गायकवाड महिला अध्यक्षा पल्लवी भोईर, उपाध्यक्षा नंदा गायकवाड, सुनंदा जमदाडे, सुप्रिया गरुडे यांच्यासह सरपंच नितीन तवले, युवक अध्यक्ष प्रशांत बोंबे, पुष्पा खालापूरकर, अनंत बोंबे, राजेश कदम, अमित गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, **मौजे आष्टे, ता. पनवेल, जि, रायगड** येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे:-

**मौजे आष्टे, ता. पनवेल, जि, रायगड.**

| भोगवटादाराचे नाव/हिस्सेदार | गट/सर्व्हे भूमापन.नं. | हिस्सा/उपविभाग नं. | क्षेत्र हे-आर.चौ.मी. | आकार रु पैसे |
|---|---|---|---|---|
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/१ | बिन शेती | ३-५८-०० | ३५.८० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-५८-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/४ | बिन शेती | ३-१३-०० | ३१.३० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-१३-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/६ | बिन शेती | ३-७०-०० | ३७.०० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-७०-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/८ | बिन शेती | ३-५१-०० | ३५.१० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-५१-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/९ | बिन शेती | ४-१९-०० | ४१.९० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ४-१९-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/२७ | बिन शेती | ३-०२-०० | ३०.२० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-०२-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/३२ | बिन शेती | ३-९२-०० | ३९.२० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-९२-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/३६ | बिन शेती | ३-६८-०० | ३६.८० |
| | | पो. ख. | ०-००-०० | |
| | | एकुण | ३-६८-०० | |
| सहयाद्री को. ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. लि. आष्टे | १५७/४४ | बिन शेती | ३-००-०० | ३०.०० |
| | | पो. ख. | ०-०-०० | |
| | | एकुण | ३-००-०० | |

**वरील संपूर्ण क्षेत्राचा कायम स्वरूपी विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार**

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दि. - १४/०२/२०२५**

**सही/-**
**(निलम वैभव विभुते)**
**वकील.**
**पत्ता : ऑफिस नं. १३, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ७२४९७७७७७७.**



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to Public at large that Our Client, **M/s. Mega Group** through its Proprietor **Mr. Mohammed Yusuf Chaudhary,** having office at Office No. 109, Satara Plaza, Plot No. 19/20, Palm Beach Road, Near Palm Beach Galleria, Sector- 19D, Vashi, Navi Mumbai-400705, have purchased Plot (more particularly described hereinunder) From Owners **1) Mr. Baban Shravan Thakur, 2) Mr. Mohan Shravan Thakur, 3) Smt. Shantabai Raghunath Gondali @ Shantabai Shravan Thakur, 4) Smt. Somubai Gopinath Thakur, 5) Mr. Shashikant Gopinath Thakur, 6) Mr. Pralhad Gopinath Thakur, 7) Smt. Suvarna Satish Kanekar @ Suvarna Gopinath Thakur**

**Description of Plot Allotted under 12.5% Scheme At-Ulwe Node, Tal. Panvel, Dist. Raigad**

| Village Name/Node | Plot No. | Sector | Area |
|---|---|---|---|
| Ulwe, Gavhan Village, Tal - Panvel Dist - Raigad | 201 | 19 | 649.75 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction/sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

Date: 13/02/2024

**sd/-**
**Pankaj V. Mandhare**
**Advocate**
UL-2/11, 702, 7th Floor, Sector 19A, Unnati, Ulwe, Panvel 410206 Mob. 9702416111
adv.pankajmandhare@gmail.com


# जिंदल विद्या मंदिर साळाव येथे बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा समारंभ अकरावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात व प्रेमाने आयोजित केला.

अकरावीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन व भाषणांच्या माध्यमातून बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आपल्या भावना व्यक्त केल्या. शाळेतील आठवणींना उजाळा देत काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतांतून शिक्षक व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

समारंभात बारावीतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने विशेष गिफ्ट देण्यात आले. यानंतर मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत, भविष्यात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.

संपूर्ण वातावरण भावनिक आणि आनंददायी असून, विद्यार्थ्यांनी शाळेच्या या अविस्मरणीय आठवणी हृदयात कोरून ठेवल्या. या वेळी आभार प्रदर्शन कार्यक्रम उपप्राचार्य मंगेश बामनोटे यांनी केले कार्यक्रमास असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


## ग्रामपंचायत तुरुबांडी,

मु. तुरुबांडी ता. म्हसळा, जि. रायगड

दिनांक १३/०२/२०२५

| अ.क्र. | कामाचे नाव | वर्ष | रक्कम | अनुदान प्रकार | १% इसारा | निविदा फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुरुबांडी येथे हिंगर खान तलाव दुरुस्ती करणे. | २०२४-२०२५ | २,०७,८५०/- | टाईड | २०७९/- | १००/- | ३ महिने |
| २ | के एल चव्हाण यांच्या घरापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत कॉक्रीट करणे, | २०२४-२०२५ | १,६२,१०६/- | अन टाईड | १६२१/- | १००/- | ३ महिने |
| ३ | तुरुबांडी येथे बस स्थानकाला पाणी पुरवठा करणे | २०२३-२०२४ | १,९६,२००/- | टाईड | १९६२/- | १००/- | ३ महिने |
| ४ | वैयक्तिक डसबीन खरेदी करणे | २०२४-२०२५ | २,०७,८५०/- | टाईड | ०/- | १००/- | ३ महिने |

**अटी शर्ती :-**

१. सिलबंद निविदा दिनांक १४/०२/२०२५ ते दि. १७/०२/२०२५ या कालावधी पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावी
२. प्राप्त निविदा मासिक सभेत उघडण्यात येतील.
३. निविदा सादर करताना ठेकेदाराने प्रत्येक कामाची १% इसारा रक्कम भरणा केल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
४. मुदतीत न आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
६. काम पूर्ण झाल्यावर एक वर्ष विनामुल्य देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**सही/-**
**श्री. एम.एस. जाधव**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**तुरुबांडी, ता म्हसळा, जि. रायगड**

# बांधकामांना प्रक्रियायुक्त पाणीवापर बंधनकारक

## नवी मुंबई महापालिका आयुक्तांचा निर्णय



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वत:च्या मालकीचे धरण असूनही काही भागात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईमुळे सतर्क बनलेल्या नवी मुंबई महापालिकेने येत्या उन्हाळ्यातील पाण्याच्या नियोजनासाठी आतापासूनच कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये, असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी काढले आहेत. महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियायुक्त पाण्याचा या बांधकामांसाठी वापर केला जावा, असे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण सात मलप्रक्रिया केंद्रे कार्यान्वित आहेत. ही सगळी मलप्रक्रिया केंद्रे एस.बी.आर. तंत्रज्ञानावर आधारित असून संपूर्ण राज्यात अशाप्रकारे अत्याधुनिक तंत्रज्ञान असणारी ही केंद्रे यापूर्वीही नावाजली गेली आहेत. ठाणे खाडीत प्रदूषित पाणी जाऊ नये यासाठी महापालिकेने मागील २० वर्षांपासून टप्प्याटप्प्याने शहरातील प्रमुख उपनगरांमध्ये सात ठिकाणी ही केंद्रे उभी केली आहेत. या केंद्रांत प्रक्रिया केले जाणारे पाणी लगतच असलेल्या ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील कारखान्यांना देता येईल का याचाही विचार महापालिका स्तरावर सुरू आहे, असे असताना मार्च ते जून महिन्याचा कालावधी लक्षात घेता महापालिका आयुक्त डॉ. शिंदे यांनी या प्रक्रियायुक्त पाण्याचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी महत्वाचे निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे.

मलप्रक्रिया केंद्रांमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या 'अमृत मिशन' अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कोपरखैरणे व ऐरोली येथे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट उभारण्यात आले आहेत. सदर द्विस्तरीय प्रक्रियाकृत पाण्यावर त्रिस्तरीय प्रक्रिया करून हे पुनर्प्रक्रियायुक्त सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील, औद्योगिक संस्थांना पिण्याशिवाय इतर वापरासाठी पुरविण्यात येते. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत सिडकोनिर्मित धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाची कामे सुरू झालेली असून इतर खाजगी भूखंडावरील विकास कामेसुद्धा प्रगतीपथावर आहेत.

या विकास कामांकरिता पिण्यायोग्य पाण्याचा वापर होतो. पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणात पुनर्प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध असल्याने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नगररचना विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांच्या बांधकामासाठी यापुढे उपरोक्त त्रिस्तरीय पुनर्प्रकियाकृत पाण्याचा वापर करणे विकासकास बंधनकारक करण्याचा निर्णय बुधवारी घेण्यात आला. मार्च महिन्यापासून प्रत्येक बांधकामाला हा निर्णय बंधनकारक असणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

> *पाण्याचे स्रोत आणि वाढती गरज लक्षात घेऊन यासंबंधी महत्वाचे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर उत्तम प्रतीचे प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध असल्याने बांधकामांसाठी त्याचा वापर करण्यास काहीही हरकत नाही. त्यामुळे यापुढील बांधकामांसाठी हे पाणी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे पाणी पुरविण्याची स्वतंत्र व्यवस्था केली गेली आहे.*
>
> **-डॉ. कैलाश शिंदे, आयुक्त,** नवी मुंबई महापालिका

# कळंबोलीत स्लॅब कोसळला

## सुदैवाने जीवितहानी नाही

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कळंबोली सेक्टर २ येथील के- एल ५ टाईप बिल्डिंग नंबर २८ मधील रूम नंबर २ फ्लॅटमधील बेडरूमचा स्लॅब गुरुवारी पहाटे पावणेएक वाजता अचानक कोसळला. या घटनेच्या अवघ्या दोन तासांपूर्वी त्या घरात भाड्याने राहत असलेले सुभाष कवले आणि त्यांचे कुटुंब सोलापूर या आपल्या गावी गेले असल्याने सुदैवाने मोठी जीवित हानी झाली नाही तर घरात असलेला अल्केश हा हॉलमध्ये झोपला असल्याने बचावला.

कळंबोली येथील सिडकोनिर्मित के एल टाईप इमारती सुमारे ४० वर्षांपूर्वीच्या असून त्या सध्या मोडकळीस आलेल्या आहेत. या साईबाबा अपार्टमेंट इमारतदेखील सुमारे ४० वर्षे जुनी आहे. या ठिकाणी भाड्याने वास्तव्यास असलेले कवले कुटुंबीय बुधवारी ११ वाजता सोलापूर येथील आपल्या मूळ गावी गेले. त्यानंतर गुरुवारी पहाटे पावणे एक वाजण्याच्या सुमारास फ्लॅटच्या बेडरूमचा स्लॅब पंख्यांसह कोसळला. या वेळी कवले यांचा मुलगा हॉलमध्ये झोपला असल्याने सुदैवाने बचावला.



इमारती सुमारे चाळीस वर्ष पूर्वीच्या आहेत. दुर्घटना झालेल्या फ्लॅटची पाहणी करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी पनवेल मनपा प्रशासनाकडे करणार असल्याचे साईबाबा अपार्टमेंटचे स्थानिक पदाधिकारी अशोक बोडरे यांनी सांगितले.

# 'विद्याभवन'च्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील प्राथमिक मराठी विभागातील शिक्षिका नूतन गवांदे आणि आरती औचर यांना विश्वसमता कलामंच व डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विश्व समता आदर्श शिक्षिका या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रीडा इत्यादी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. नूतन गवांदे या उपक्रमशील शिक्षिका असून गेल्या पंचवीस वर्षांपासून त्या अध्यापन करीत आहेत. 'रद्दीतून ग्रंथ भांडार' हा अनोखा उपक्रम त्यांनी राबवला होता. यापूर्वी त्यांना अनेक सन्मान मिळाले आहेत. आरती औचर यांनीदेखील गेली चौदा वर्षे अध्यापनाचे कार्य केले असून नवी मुंबईत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, समन्वयक पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी या शिक्षिकांचे अभिनंदन केले.

# रानसई ठाकूरवाडीत किसान गोष्टी कार्यक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील रानसई ठाकूरवाडी येथील आदिवासी शेतकरी बांधवांसाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या वेळी उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी आदिवासी जमातीच्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ व्हायला पाहिजे, त्यांचे उत्पादन वाढले तर त्यांचे जीवनमान उंचावेल हा उद्देश ठेवून, कृषी विभागाच्या योजनांबाबत आदिवासी बांधवांना माहिती देऊन, मार्गदर्शन केले.

आदिवासी शेतकऱ्यांनी योजनांविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत, त्यांच्या शंकांचे निरसन केले.तसेच डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत स्थापन केलेल्या गटांच्या अध्यक्ष व सदस्यांबरोबर शेती विषयक चर्चा करून पुढील वर्षात राबवण्यात येणाऱ्या आर्थिक वर्षातील कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन केले.

दरम्यान, या किसान गोष्टी कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या डॉ. आरेकर, शास्त्रज्ञ के.व्ही. केकिल्ला (रोहा) यांनी भाजीपाला पीकाची लागवड करताना जमिनीची करण्यात येणारी मशागत, बियाण्यांची योग्य ती निवड तसेच भाजीपाला पिकांच्या वाढीच्या अवस्थेत पडणाऱ्या कीड व रोगाबाबत मार्गदर्शन केले. आणि त्यावरील बुरशीजन्य रोग व इतर रोग यांचे व्यवस्थापन व उपाययोजनांचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्यक्ष भाजीपाला प्रक्षेत्रावर जाऊन मळ्यांची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी कृषी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत सेक्टर -१५,कोपरखैरणे येथे नवी मुंबई यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. या बांधकामावर निस्कासनाची कार्यवाही करण्यात आली. तसेच सेक्टर १२ डी, रामनगर, बोनकोडे, कोपरखैरणे येथे यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. बांधकामाचे तिसऱ्या मजल्याचे बांधकाम अंशतः तोडक कारवाई करण्यात आली. कोपरखैरणे सेक्टर -१८,रूम नं ४५ समोर दिव्यांग स्टॉलच्या मागील बाजुच्या ओटल्याचे बांधकाम निष्कासित करण्यात आले. अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बजेट विश्लेषण स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१२) वाणिज्य विभागातर्फे युनियन बजेट २०२५ वर विश्लेषण स्पर्धा आयोजित केली होती.

या स्पर्धेच्या मुख्य हेतू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना युनियन बजेट २०२५ वर चांगल्या पद्धतीने सादरीकरण तसेच विश्लेषण करता यावे हा होता. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. योगिता पाटील यांनी काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रमोद वाघे यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. मनोज यादव, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले व शेवटी सर्वांचे आभार मानले.

# जुईनगर येथे भव्य महाराष्ट्र जत्रौत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र महोत्सव समिती आयोजित व महाराष्ट्र महोत्सव समिती नवी मुंबईचे अध्यक्ष, भाजपा नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य महाराष्ट्र जत्रौत्सव २०२५ चे आयोजन श्री स्वामी समर्थ मठाच्या बाजूला सेक्टर २२,जुईनगर येथे करण्यात आले आहे.




महाराष्ट्र जत्रौत्सवाचे हे २४वे वर्ष आहे. सर्वांना हवाहवासा वाटणारा, आपुलकी, जिव्हाळा जपणारा या महाराष्ट्र जत्रौत्सवाचा शुभारंभ ७ फेब्रुवारीला झाला असून १६ फेब्रुवारी पर्यंत म्हणजे १० दिवसांचा आहे. या जत्रौत्सवात लोणची, पापड, खारवलेले मासे, विविध दर्जेदार उत्पादने, चमचमीत कोंबडी वडे, तिसऱ्या, चिंबोरी यांची झणझणीत मेजवानी, खेळणी, महिलांकरिता निखळ मनोरंजन आणि छोट्यांसाठी बालनगरी अशा विविध मेजवानीची रेलचेल असणार आहे.

महाराष्ट्र महोत्सव समितीच्या वतीने माजी नगरसेवक आणि माजी परिवहन समिती सदस्य काशिनाथ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने ११ फेब्रुवारी रोजी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशिनाथ पाटील यांना कुटुंबातील सदस्य, मित्र, विविध पक्षातील, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि स्थानिक रहिवासी यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी युवानेते ऋषिकेश काशिनाथ पाटील व हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनीदेखील जत्रौत्सवाला भेट दिली व माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी आमदार मंदाताई म्हात्रे म्हणाल्या, आम्ही सर्व महिलाभगिनी, ज्येष्ठ नागरिक, शाळेचे विद्यार्थी उपस्थित आहोत. काशिनाथ पाटील यांच्या पुढील आयुष्यासाठी, भविष्यासाठी आणि समाजकार्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

ज्या नगरसेवकाने आपल्या प्रभागात काम केलेलं असतं, त्यालाच चांगला प्रतिसाद मिळतो म्हणूनच आज अलोट गर्दी शुभेच्छा देण्यासाठी जमली. काशिनाथ दादांच्या कारकीर्दीत प्रभागाचा कायापालट झाला. आज आमदार मंदाताई म्हात्रे यांनी जत्रौत्सव भेट दिली, त्यांनाही आनंद झाला. २४ वर्षे सातत्याने एखादा कार्यक्रम हा लोकांच्या प्रतिसादाशिवाय होत नाही.

या महोत्सवाच्या निमित्ताने छोटीशी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असतो. १७ बचत गटांनी व्यवसाय इथे थाटले आहेत. तसेच कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांतील संस्कृती, परंपरा, संस्कार या व्यासपीठावरून दाखवण्याचा प्रयत्न आहे. ज्येष्ठांचा सन्मान, स्थानिक मुलांचे कलाप्रदर्शन देखील इथे असणार आहे, असे भाजप नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.

# आरोग्य तपासणी शिबिर व क्षयरोग जनजागृती कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

जिल्हा क्षयरोग कार्यालय अलिबाग रायगड, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय उरण आणि ओ.एन.जी.सी. लि. कंपनी उरण यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा, मुळेखंड, उरण येथे आरोग्य तपासणी शिबिर व क्षयरोग जनजागृती कार्यक्रमा संपन्न झाला.

या शिबिरात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच क्षयरोगासंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना सकस व पोषक आहार वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जागरूकता, क्षयरोगासंदर्भात महत्त्वाची माहिती मिळाली.

या कार्यक्रमाला प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, आरोग्य विभागाचे पी.पी.एम. समन्वयक, एस.टी.एल.एस., टी.बी.एच.व्ही. आणि डॉक्टर,शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ओ.एन.जी.सी. कंपनीचे प्लांट मॅनेजर, डेप्युटी प्लांट मॅनेज उपस्थित होते.



## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : भाताचे कोठार म्हणून ओळखले जाणाऱ्या रागयड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात सर्वांत जास्त भात गिरण्या आहेत. कालांतराने शेती क्षेत्र कमी झाल्याने गिरण्या बंद झाल्या, परंतु काही भागात थोड्या प्रमाणात भात गिरण्या सुरू आहेत.**

# बाजारात गोड द्राक्षांची आवक सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत डिसेंबर-जानेवारीपासून तुरळक प्रमाणात द्राक्षे दाखल होण्यास सुरुवात झाली होती. परंतु ती द्राक्षे चवीला आंबट होती. आता उष्णता वाढायला सुरुवात झाल्याने गोड द्राक्षे बाजारात दाखल होण्यास सुरुवात झालेली आहे. नोव्हेंबर महिन्यात द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होते. तसेच जानेवारी मध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते.

साधारण १५ नोव्हेंम्बर नंतर द्राक्षची आवक सुरू होत असून १५ एप्रिलपर्यत हंगाम सुरू असतो, परंतु यंदा पाऊस लांबल्याने द्राक्षांच्या बागांची छाटणी एक महिना उशिराने सुरू झाली. त्यामुळे यंदा हंगाम सुरू होण्यास विलंब झाला आहे.




सुरुवातीला बाजारात आवक तुरळक होती, शिवाय दाखल होणारे द्राक्ष चवीला आंबट होते. त्यामुळे ग्राहक गोड द्राक्षांच्या प्रतीक्षेत होते. परंतु ग्राहकांची प्रतीक्षा संपली असून बाजारात आता गोड द्राक्षांच्या हंगामाला सुरुवात झाली आहे.

बाजारात आधी २-३ गाडी दाखल होत असत. आता ९-१० गाड्या दाखल होत असून बुधवारी बाजारात ७०० क्विंटल द्राक्षे दाखल झाली आहेत. सध्या द्राक्षाच्या बागेला पोषक अशा उष्ण वातावरणाची निर्मिती सुरू झाली आहे. या उष्णतेमुळे फळामध्ये गोड रस निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे. घाऊक बाजारात सफेद द्राक्षांच्या ९-१० किलो पेटीला ५०० ते ९०० रुपये बाजारभाव आहे. मार्चमध्ये मोठ्या प्रमाणावर द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होईल, तसेच १५ एप्रिलपर्यंत द्राक्षांचा हंगाम सुरू राहील, असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

> सध्या द्राक्षाच्या बागेला पोषक अशा उष्ण वातावरणाची निर्मिती सुरू झाली आहे. या उष्णतेमुळे फळामध्ये गोड रस निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे. नाशिक, तासगाव, सातारा आणि सांगलीमधून द्राक्षांची आवक होत आहे. बाजारात यापुढे अधिक प्रमाणात गोड द्राक्ष बाजारात दाखल होतील.
>
> **-संजय पिंपळे,** घाऊक फळ व्यापारी

# भिरा धरणातुन पाणी मिळाल्यावर निजामपुर विभाग होणार टंचाईमुक्त

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागाला भिरा धरणाचे पाणीपुरवठा झाल्यास या भागातील पाणी टंचाईवर मात होऊन येथील दुष्काळी परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते. या पाण्याचा मोठा वापर टाटा पॉवर वीज प्रकल्पांसाठी तर उर्वरित पाणी कुंडलिका नदीत सोडण्यात येत आहे. याच पाण्याचा ५० टक्के हिस्सा निजामपूर विभागाला देण्यात यावे, अशी मागणी निजामपूर विभागातील हजारो शेतकरी आणि ग्रामस्थांनी केली आहे.

कुंडलिका नदीला भीरा धरणामधून बॅकवॉटर स्वरूपात पाणी येते, ज्याचा मोठा भाग टाटा पॉवरसाठी वापरला जातो, मात्र याच पाण्याचा काही हिस्सा जर निजामपूर गावाला पुरवला गेला, तर गावातील पाण्याची तीव्र टंचाई काही प्रमाणात कमी होऊ शकते. गेल्या काही वर्षांपासून निजामपूर गाव दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करत आहे. स्थानिक जलस्रोत आटले असून, शेती व पिण्यासाठी आवश्यक पुरेसा पाणीपुरवठा होत नाही.

दुसरीकडे, भीरा धरणातून येणारे पाणी कुंडलिका नदीतून प्रवाहित होते आणि त्याचा उपयोग मुख्यतः औद्योगिक कारणांसाठी केला जातो. या धरणातून ५.३६ दशलक्ष घनमीटर पाणी सोडण्यात येत आहे. गावकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, भीरा धरणातून कुंडलिका नदीत येणाऱ्या पाण्याचा काही भाग निजामपूर विभागातील गावांसाठी वळवण्यात यावा. यामुळे पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीसाठीही पाणी मिळू शकते आणि दुष्काळी स्थिती थोडीफार तरी सुधारू शकते. याबाबत प्रशासनाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक पातळीवर जलसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास आणि औद्योगिक पाण्याच्या वितरणात थोडा समतोल साधल्यास, निजामपूरसह परिसरातील इतर गावांनाही दिलासा मिळू शकतो. याबाबत स्थानिक प्रशासन आणि टाटा पॉवर यांच्यात त्वरित चर्चा होणे गरजेचे आहे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

याच भागात केळगण-कुंभे धरणाचे काम गेली अनेक वर्षापासून रखडले आहे. या धरणातील पाणी महाड आणि माणगाव तालुक्यातील निजामपूर भागाला मिळणार होते. आता तीही शक्यता मावळली आहे. या धरणाचे काम सुरू करण्यासाठी मंत्री भरत गोगावले यांनी ६६० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

अद्यापही काम सुरू झालेले नाही. उन्हाळ्यात हा सुमारे १०० गावांचा परीसर पिण्याच्या पाण्यावीना तडफडत असतो. या भागात पाणीटंचाई जाणवत असल्याने निजामपूर भागाचा शाश्वत विकास खुंटला आहे.

### *पाणी पुरवठा योजना राबविणे गरजेच*

***रोजगार नसल्याने येथील तरुण मुंबई आणि पुणे या शहरात नोकरीसाठी स्थलांतरित झालेला पहावयास मिळत आहे. त्यामुळे या भागात पाणीपुरवठा योजना राबविणे गरजेचे आहे. तसेच भिरा धरणाचे पाणी या भागाला दुबार शेती, भाजीपाला आणि फळफळावळ करता येईल.***

# मुरूडमध्ये मासिक पाळीसंदर्भात विद्यार्थिनींसह महिलांना मार्गदर्शन



**मुरूड : प्रतिनिधी**

मासिक पाळीचा मुलींच्या आरोग्याशी थेट संबंध असतो. यामुळे स्वच्छतेची योग्य काळजी न घेतल्यास आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. धक्काधक्कीचे आयुष्य, अभ्यासाचा ताण इत्यादी गोष्टींमुळे मुलींना व महिलांना स्वतःकडे लक्ष देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. ह्यावर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी निर्णय फाऊंडेशनच्या संगीता बालोदे यांच्याकडून विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले.

ह्या कार्यक्रमाचे आयोजन दिघी अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले शाळा, पी एन पी हायस्कूल वडवली, रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा वडवली, दिघी कोळीवाडा महिला वर्ग त्याचप्रमाणे द. ग. तटकरे हायस्कूल विरझोली येथील किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी करण्यात आले. एकूण ४०२ मुलींनी या कार्यक्रमांचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाला उपस्थित मुख्याध्यापक रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा वडवली मुख्याध्यापिका पूजा मुरकर, पी. एन. पी. हायस्कूल वडवली शिक्षिका नितिशा मोकल, सुवर्णा डोळस, वडवली आगरी समाज महिला उपाध्यक्षा उज्वला बिराडी, विरझोली शाळेचे मुख्याध्यापक मार्गे सर, अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले शाळा दिघी येथील शिक्षिका ममता सोनवणे, शलाका पाटील, अश्रफी नदाफ, वंदना माने उपस्थित होते.

अदाणी फाऊंडेशनच्या जयश्री काळे यांनी पोषण कार्यक्रम अंतर्गत अदाणी फाऊंडेशन मार्फत असे कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी अदाणी फाऊंडेशनचे अवधूत पाटील यांनी अथक परिश्रम घेतले. ग्राम सखी नम्रता दिघीकर आणि अरुंधती पिळणकर यांनी जनजागृतीसाठी विशेष परिश्रम घेतले.

# नागोठण्यात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष

**नागोठणे : बातमीदार**



भारतीय जनता पक्षाने दिल्लीमध्ये ४८ आमदार निवडून आणुन एकहाती सत्ता मिळविल्याने नागोठण्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकमध्ये फटाक्यांची आतिषबाजी करून व पेढे वाटून विजयी जल्लोष साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांनी नरेंद्र मोदी आगे बढो हम तुम्हारे साथ है, भारतीय जनता पक्षाचा विजय असो, अशा घोषणांनी परिसर दाणाणून गेला होता.

भाजप नागोठणे शहर अध्यक्ष शहर सचिन मोदी यांनी विजयी जल्लोष साजरा केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले की, २७ वर्षानंतर दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाची सत्ता आली आहे त्यामुळे निश्चितच आम्हा सगळ्यांना आनंद झाला आहे. मोदीजींची गॅरंटी या एका फॅक्टरमुळे ही सत्ता आली आहे. अमितजी शहा यांनी पण सूक्ष्म नियोजन केले तसेच सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. आता मोदीजी व अमितजी शहा यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या रखडलेला विकास चांगल्या पद्धतीने होईल, असे शेवटी सचिन मोदी यांनी सांगितले.

विजयी जल्लोष साजरा करताना रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, शहर अध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे, शिक्षण सेल ता. अध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाळे, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, अंकुश सुटे, संजय पानकर, हेमंत जांबेकर, संजय नांगरे, सगिर पानसरे, सुदेश येरुणकर आदी पदाधिकारीसह बहुसंख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# लायन्स क्लब नागोठणेतर्फे नेत्र तपासणी शिबिर

**नागोठणे : बातमीदार**



'मोतिबिंदू मुक्त रोहा तालुका अभियान' अंतर्गत लायन्स क्लब नागोठणे तर्फे आर झुनझुनवाला - शंकरा आय हॉस्पीटल पनवेल यांचे सहकार्याने गेली तीन वर्ष हे अभियान राबवित आहे.

या अभियानांतर्गत स्वर्गिय सुलेखा यशवंत चित्रे यांचे स्मरणार्थ पाचवा स्मृती दिनानिमीत्त एमजेएफ लायन यशवंत चित्रे यांच्या सौजन्याने मोफत मोतिबिंदू ऑपरेशन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ६२ लोकांचे डोळे तपासणी करण्यात आले यामध्ये १४ मोतिबिंदू रुग्ण आढळले असून त्यांना ऑपरेशनसाठी त्वरीत पनवेल येथे पाठविण्यात आले असल्याची माहिती एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी दिली. दरम्यान, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असलेला अर्थव सवादकर यांस एमजेएफ लायन यशवंत चित्रे यांनी स्वखर्चाने लॅपटॉप भेट दिला.

या कार्यक्रमाला लायन्स क्लब डायमंड अलिबाग सेक्रेटरी लायन ॲड.अंकिता पाटील, डिस्ट्रीक्ट चेअरमन शिक्षण, एमजेएफ लायन यशवंत चित्रे, अध्यक्ष लायन्स क्लब नागोठणे सुनील कुथे, झोन चेअरमन एमजेएफ विवेक सुभेकर, नागोठणे माजी सरपंच लायन विलास चौलकर, उपाध्यक्ष संतोष शहासने, उपाध्यक्ष विशाल शिंदे, सेक्रेटरी डॉ.अनिल गिते, खजिनदार दिपक गायकवाड, एमजेएफ लायन सुधाकर जवके, दौलत मोदी, सुजाता जवके, लायन विवेक करडे, दिपक लोणारी, जयराम पवार, वरद उपाध्ये, श्वेता चौलकर, श्री अष्टविनायक पतसंस्थेचे उपाध्यक्ष महादेवसिंग परदेशी, संचालक रोहीदास हातनोलकर, प्रकाश जाधव, व्यवस्थापक शैला घासे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार एमजेएफ विवेक सुभेकर यांनी मानले.

# क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे वार्षिक कुलसंमेलन



**चौक : प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ऐतिहासिक जामगे गावात श्री कोटेश्वरी मानाई देवस्थान येथे क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे सातवे राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन मोठ्या उत्साहात दोन दिवसांत झाले. संपूर्ण महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश, गोवा येथील कदम कुळातील बांधव उपस्थित होते.

कदंब राज घराण्याच्या ध्वज गृहराज्य मंत्री ना. योगेश कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आला. या वेळी कदम कुळातील विशेष कामगिरी केलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अध्यक्ष आणि तुळजापूर भवानीचे प्रमुख पुजारी अमरराजे कदम यांनी केले. महाराष्ट्रातील कदम समाजातील बंधू-भगिनींमध्ये एकता, संवाद आणि सहकार्य वाढविणे हा प्रमुख उद्देश असुन समाजातील बांधवांना नोकरी, उद्योग व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात येईल असे अमरराजे कदम यांनी सांगितले.

माजी मंत्री व शिवसेना नेते रामदास कदम यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले की, कदम बांधवांनी एकत्र येऊन सहकार्याची भावना जपावी आणि सामूहिक प्रगती साधावी, असे आवाहन करून सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. रामदास कदम यांनी पुढील आठवे राज्यस्तरीय कुलसंमेलन नाशिक, निफाड येथे आयोजित केल्याची घोषणा केली.

संमेलनाच्या आयोजनात रत्नागिरी जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती चंद्रकांत उर्फ अण्णा कदम, क्षत्रिय मराठा कदम परिवार राज्य सचिव रामजी कदम तसेच कार्यकारीणी सदस्य गणेश कदम, रामभाऊ कदम, विलास कदम, लक्ष्मण कदम, एकनाथ निकम, रामजी कदम आदींनी पुढाकार घेतला होता.

समाजाच्या प्रगतीसाठी असे संमेलन महत्त्वाचे असून, भविष्यातील कुलसंमेलनांना आणखी मोठा प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या वेळी शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रा. डॉ.सतीश कदम, उद्योजक मनोज कदम यांचे व्याख्यान झाले. निफाडचे माजी आमदार अनिल कदम यांनी मनोगत व्यक्त केले. सन १९७८ मधील महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सचिव सूत्रसंचालन रामजी कदम यांनी केले.

## श्री मानकरीदेव वर्धापन दिन सोहळा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दिवेआगरतील श्री मानकरीदेव (गांबदेव) यांचा वर्धापन दिन १९ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य महाप्रसाद आणि पालखी मिरवणुकीसह साजरा केला जाणार आहे. यावेळी दिवेआगर व पंचक्रोशातील सर्व भाविक आणि समाज बांधवांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्री मानकरीदेव यांच्या वर्धापन दिनानिमित्त होणारा हा उत्सव संपूर्ण दिवेआगर आणि परिसरातील भाविकांसाठी एक अत्यंत विशेष आणि धार्मिक महत्वाचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री मानकरीदेवाच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा, अशी सुसंस्कार व एकजुटीची भावना स्थानिक समाजात निर्माण होईल.


अखंड कोळी समाज, दिवेआगर यांच्या वतीने आयोजित केलेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व भक्तांना सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**माणगाव : येथील अशोक दादा साबळे विद्यालयाच्या बारावी परीक्षा केंद्रामध्ये बारावी परीक्षार्थींचे गटशिक्षणाधिकारी सुरेख तांबट, बारावी केंद्र प्रमुख आणि मुख्याध्यापक धनाजी जाधव व शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.**

# लोकसंस्कृतीचे विपुल लेखन करणाऱ्या ताराबाई भवाळकर

२१ ते २३ फेब्रुवारीमध्ये दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होऊ घातले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संम्मेलनाचे उद्घाटन होणार आहे. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांच्या विषयी घेतलेला हा धांदोळा.



८५ वर्षीय भावलकर यांनी मराठी साहित्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी विविध नाटके, पुस्तके आणि संशोधनात्मक लेख लिहिले आहेत. भावलकर यांनी नऊ वेगवेगळ्या संमेलनांचे अध्यक्षपद भूषवले असून मराठी साहित्यासाठी काम करणाऱ्या विविध संस्थामध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषवली आहेत.

लोकसंस्कृती विषयी विपुल लेखन करणाऱ्या ताराबाई भवाळकर या मुळच्या पुण्याच्या ताराबाईंच्या वडिलांच्या सतत बदल्या होत, त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण एका ठिकाणी होऊ शकले नाही. एस.एस.सी. नंतरचे सर्व शिक्षण त्यांनी नोकरी करून बहि:स्थ पद्धतीने केले. १९६७ साली त्या एम.ए. झाल्या. त्याखेरीज राष्ट्रभाषा पंडित व अनुवाद पंडित या परीक्षाही त्या उत्तीर्ण झाल्या. पीएच.डी.साठी त्यांचा विषय होता 'मराठी पौराणिक नाटकाची जडणघडण'(प्रारंभ ते १९२०). त्यांच्या या प्रबंधाला पुणे विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठीचे पारितोषिक मिळाले.

ज्ञानाच्या आवडीतून त्यांनी अध्यापन हेच क्षेत्र निवडले. १९५८ पासून १९७० पर्यंत माध्यमिक शाळेत शिक्षिका, १९७० पासून १९९९ पर्यंत सांगली येथील श्रीमती चंपाबेन वालचंद शाह महिला महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून त्या कार्यरत राहिल्या. विद्यावाचस्पती (पीएच.डी.) मार्गदर्शक या नात्यानेही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. बृहन्महाराष्ट्रातील अनेक संस्था आणि विद्यापीठातून त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली आहेत. 'मायवाटेचा मागोवा' हे पुस्तकही स्त्रीवादी दृष्टिकोनातून संशोधन करणाऱ्याना मूल्यवान संदर्भ म्हणून उपयुक्त आहे.

पारंपरिक, कुटुंबात जन्मलेल्या ताराबाईंनी वस्तुनिष्ठ व यथार्थ चिकित्सक दृष्टी प्रयत्नपूर्वक जोपासून, स्त्री-जीवनाविषयी विशेष आस्थेने, लोकसंस्कृतीचे, लोकसाहित्याचे, लोककलेचे सखोल व व्यापक दर्शन घडविण्यात प्रशंसनीय कामगिरी बजावली आहे. त्यांचे बहुतेक लेखन लोकसंस्कृती व नाटक या दोन विषयांवर असून त्यांनी पूर्वसुरींचे संशोधनपर साहित्य अभ्यासले आहे. बालजीवनातल्या समृद्ध अनुभवांची शिदोरी त्यांच्या चांगलीच कामाला आली. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, वि.का. राजवाडे, धर्मानंद कोसंबी, तसेच दुर्गाबाई भागवत, डॉ.रा.चिं. ढेरे प्रभृती महानुभावांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रेरणेचा व मार्गदर्शनाचा ताराबाई कृतज्ञतेने उल्लेख करतात.

'लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा' या आपल्या प्रथम पुस्तकाविषयी निमित्त म्हणून आंतरराष्ट्रीय महिला मुक्ती वर्ष १९७५ झाले तरी त्यांना तीव्रतेने जाणवले की, 'आजवर पारंपरिक स्त्रीविषयी जे लिहिले-बोलले जात आहे, (गेले आहे) त्या सर्वांचे आधार पुरुष लेखकांच्या लेखनात आहेत.... मग खऱ्या अर्थाने स्त्रीचे मन कुठे भेटत असेल, तर ते स्त्री-रचित परंपराशील देशी भाषेतील लोकसाहित्यात.' त्यांना करुणेने, वेदनेने ओथंबलेली बाई दिसली त्यापेक्षा अधिक विद्रोह करणारी ही बाई त्यांना ओव्यांतून, कथागीतांतून दिसली. नाट्यक्षेत्रात पौराणिक नाटक, लोकनाट्य, दशावतार, तंजावरची नाटके, यक्षगान, कथकली अशा विविध नाट्यप्रकारांची जडणघडण शोधताना ताराबाईंनी दक्षिण भारताचा प्रवासही केला. रंगभूमीवर अभिनय, दिग्दर्शन, लेखन इत्यादी नात्यांनी काम केल्यामुळे नाट्याभ्यासात त्यांना भरीव मदत झाली. 'लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिभा' हे ताराबाईंचे पुस्तक म्हणजे त्यांच्या सैद्धान्तिक अभ्यासाचा पुरावाच म्हटले पाहिजे. आकाशवाणीच्या कै.पु.मं. लाड व्याख्यानमालेच्या निमित्ताने 'स्त्री-मुक्तीचा आत्मस्वर' प्रकटला (१९९४).

मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश, मराठी ग्रंथकोश आदी महत्त्वाच्या कार्यात त्यांचे योगदान आहे. १९९१ साली अमेरिकेतल्या अरिझोना स्टेट युनिव्हर्सिटीत आयोजित, 'भारतीय समाज, संस्कृती आणि स्त्री' या विषयावरील चर्चासत्रात भाग घेण्यासाठी खास निमंत्रित म्हणून त्यांची भूमिका होती.

ताराबाई यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार (१९९२), 'मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे'साठी वाङ्मय समीक्षा पुरस्कार व कै. मालतीबाई दांडेकर जीवन गौरव पुरस्कार (२००४) आदींचा समावेश आहे. जागर साहित्य संमेलन, कोकण मराठी साहित्य परिषद पहिले महिला साहित्य संमेलन, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रदेशातील साहित्य संमेलन व इतरही काही संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. ताराबाई यांची ग्रंथसंपदा विपुल असून त्यात विविधताही आहे. 'मधुशाला' (काव्यानुवाद), 'प्रियतमा' (गडकरी साहित्यातील स्त्री प्रतिमा), 'लोकांगण', 'लोकसाहित्य : वाङ्मय प्रवाह', 'मायवाटेचा मागोवा', 'आकलन आणि आस्वाद' (समीक्षा) ही त्यातील काही खास पुस्तके आहेत.

**-संकलन : संजीवनी जाधव पाटील**
**सहायक संचालक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, नवी मुंबई**

# आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी जामनेर सज्ज

## पृथ्वीराज आणि शिवराज पुन्हा एकाच मैदानात उतरणार



**जळगाव : प्रतिनिधी**

जळगावच्या जामनेर तालुक्यात येत्या १६ फेब्रुवारीला आंतरराष्ट्रीय कुस्तीयुद्ध रंगणार आहे. 'शरीर तंदुरुस्त, खेळच सर्वोत्तम' हा संदेश देत 'नमो कुस्ती महाकुंभ-२ मध्ये देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ, उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड, शिवराज राक्षेसह भारतातील नामवंत पैलवान आंतरराष्ट्रीय पैलवानांशी भिडण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा जामनेरमध्ये कुस्तीच्या महाकुंभात थराराची एक डुबकी मारण्यासाठी कुस्तीप्रेमींचा जनसागर उसळणार असून, या दंगलसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऑलिम्पिक विजेता रवी कुमार दिया, ऑलिम्पियन नरसिंग यादव, कॉमनवेल्थ विजेता राहुल आवारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांच्या संकल्पनेतून देवाभाऊ केसरीच्या निमित्ताने रंगणार्या कुस्तीत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'चा नारा देत ५० लाडक्या 'पैलवान' बहिणींच्या कुस्त्याही खेळविणार आहेत. एवढेच नव्हे तर या कुस्तीयुद्धाचा प्रारंभ आणि समारोप महिला कुस्तीनेच केला जाणार आहे. कुस्तीच्या इतिहासात महिला कुस्तीपटूंना असा सन्मान प्रथमच दिला जात असल्याची स्फूर्तिदायक माहिती संयोजक समितीचे प्रमुख हिंदकेसरी रोहित पाटील यांनी दिली. महिला कुस्तीला प्राधान्य दिल्यामुळे ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री कोळी एस्टोनियाच्या युरोपियन चॅम्पियन मार्टा पाजूलाशी भिडेल. तसेच महिला महाराष्ट्र केसरी अमृता पुजारीची गाठ रोमानियन ऑलिम्पियन कॅटालिना क्सेंटशी पडेल. अशाच महिलांच्या अनेक रोमहर्षक लढतींचे आयोजन या महाकुंभात केले जाणार आहे.

या स्पर्धेच्या निमित्ताने ९ देशांचे नामांकित मल्ल जामनेर गाठणार असून या महाकुंभाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ इराणच्या जलाल म्हजोयूबशी पंगा घेणार आहे तर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड रोमानियाचा युरोपियन विजेता फ्लोरिन ट्रिपोनशी लढणार आहे. ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीसह अनेक महाराष्ट्र केसरी आणि उपमहाराष्ट्र केसरी आंतरराष्ट्रीय पैलवानांना धोबीपछाड देण्यासाठी मैदानात उतरण्यासाठी जोरदार तयारी करत आहेत. भारतासह प्रॅान्स, मोल्दोवा, उझबेकिस्तान, रोमानिया, एस्टोनिया, इराण, ब्राझील आणि जॉर्जिया या देशांचे ऑलिंपियन, जागतिक विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, हिंद केसरी, रुस्तुम ए हिंद, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी आणि उप-महाराष्ट्र केसरी असे नामांकित पैलवान सहभागी होणार आहेत.

### स्पर्धेतील प्रमुख लढती

ट्रिपल महिला महाराष्ट्र केसरी भाग्यश्री कोळी वि. युरोपियन चॅम्पियन मार्टा पाजूला (एस्टोनिया), प्रतीक्षा बांगडी (पहिली महिला महाराष्ट्र केसरी) वि. अंजलीक गोन्झालेझ (वर्ल्ड चॅम्पियन-प्रॅान्स), शिवराज राक्षे (डबल महाराष्ट्र केसरी) वि. गुलहिर्मो लिमा (वर्ल्ड चॅम्पियन), अमृता पुजारी (महिला महाराष्ट्र केसरी) वि. कॅटालिना क्सेन्टन ऑलिम्पियन - रोमानिया), सिकंदर शेख (महाराष्ट्र केसरी) वि. घेओघे एरहाण (युरोप चॅम्पियन - मोल्दोवा), पृथ्वीराज मोहोळ (महाराष्ट्र केसरी) वि. जलाल म्हजोयूब ( आशियाई पदकविजेता - इराण), हर्षवर्धन सदगीर (महाराष्ट्र केसरी) वि. पै. इमामुक (वर्ल्ड चॅम्पियन - जॉर्जिया), सुमित मलिक (अर्जुन पुरस्कार, ऑलिंपियन) वि. पै.जस्सा (शेर ए पंजाब) , पृथ्वीराज पाटील (महाराष्ट्र केसरी) वि. पै. जॉन्टी गुज्जर (आंतरराष्ट्रीय विजेता - दिल्ली ), वेताळ शेळके (भवानी केसरी - महाराष्ट्र) वि. दिनेश गोलिया (आंतरराष्ट्रीय विजेता- हरियाणा), फ्लोरिन ट्रिपोन (युरोप चॅम्पियन - रोमानिया) वि. महेंद्र गायकवाड़ (उपमहाराष्ट्र केसरी), भूपिन्दर सिंह (भारत केसरी - पंजाब ) वि. युधिष्ठिर दिल्ली (राष्ट्रीय विजेता-हरियाणा), कमलजित धूमछडी (रुस्तुम ए हिंद - पंजाब) वि. विक्रांत कुमार (राष्ट्रीय विजेता - हरियाणा), सतेंदर मलिक (भारत केसरी - हरियाणा) वि. योगेश पवार (उप महाराष्ट्र केसरी), बालाराफिक शेख (महाराष्ट्र केसरी) वि. सोनू (हिमाचल केसरी-हरियाणा), हरियाणा माउली जमदाडे (महान भारत केसरी) वि. मनजीत खत्री (भारत केसरी-हरियाणा), शिवा चव्हाण (राष्ट्रीय विजेता - महाराष्ट्र) वि. रजत मंडोथी (त्रिमूर्ती केसरी - हरियाणा), मुन्ना झुंजुर्के (महाराष्ट्र चॅम्पियन) वि. हरिओमी ट्रॅक्टर (राष्ट्रीय विजेता- दिल्ली), बाळू बोडके (महाराष्ट्र चॅम्पियन) वि. मनजीत मेला (राष्ट्रीय विजेता- हरियाणा), वेदांतिका पवार (उपमहाराष्ट्र केसरी) वि. शिवानी मेटकर (राष्ट्रीय विजेती), अपेक्षा पाटील (राष्ट्रीय विजेती ) वि. सोनाली मंडलिक (राष्ट्रीय विजेती).

### प्रथमच आंतरराष्ट्रीय मल्लांचा कुस्ती महामुकाबला!

या महामुकाबल्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे भारताच्या कुस्ती इतिहासात प्रथमच तब्बल ९ देशांचे नामवंत महिला आणि पुरुष मल्ल एकाच मंचावर भिडणार आहेत. भारत, प्रॅान्स, मोल्दोवा, उझबेकिस्तान, रोमानिया, एस्टोनिया, इराण, ब्राझील आणि जॉर्जिया या देशाचे ऑलिंपियन, जागतिक विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, हिंद केसरी, रुस्तुम ए हिंद, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी आणि उप-महाराष्ट्र केसरी असे नामांकित पैलवान सहभागी होणार आहेत. स्पर्धेत सहभागी खेळाडूंवर बक्षीसांचा अक्षरशा वर्षाव होणार असून विजेत्यांना रोख पारितोषिकांसह मानाची गदा आणि 'देवाभाऊ केसरी' हा प्रतिष्ठेचा किताब प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती संयोजक हिंदकेसरी रोहित पटेल यांनी दिली. ही स्पर्धा रविवार, १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सुरू होऊन संध्याकाळी ८ वाजेपर्यंत चालणार आहे. महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेला जागत, या ऐतिहासिक कुस्ती दंगलीचा साक्षीदार होण्यासाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

# जिमनॅस्टिकमध्ये महाराष्ट्राचा बोलबाला

■ एरोबिक्समध्ये दोन सुवर्ण, एक रौप्य, दोन कांस्य



**डेहराडून : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने जिमनॅस्टिकमधील पदकांची लयलूट सुरूच ठेवली आहे. एरोबिक्समध्ये महाराष्ट्राने दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्य पदकाची कमाई केली.

भागीरथी संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत आर्य शहा, स्मित शहा व रामदेव बिराजदार यांनी पुरुषांच्या तिहेरी गटात १७.२५ गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. याचबरोबर महाराष्ट्राने सांघिक गटातही सुवर्णपदक जिंकले. सांघिक गटात संदेश चिंतलवाड, स्मित शहा, अभय उंटवाल, उदय मधेकर, विश्वेश पाठक यांनी १६.६० गुणांची कमाई करीत महाराष्ट्राला (सुवर्ण पदक जिंकून दिले. याचबरोबर पुरुष एकेरी आर्य शहाने १८.०५ गुणांसह रौप्य पदकाची कमाई केली. महिला एकेरीत गौरी ब्राह्मणे हिने १५.७५ गुणांसह कांस्यपदक जिंकले. मिश्र दुहेरी श्रीपाद हराळ व मानसी देशमुख यांनी १५.२० गुणांसह महाराष्ट्राला कास्यपदक जिंकून दिले.

# शिखर धवनची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत एन्ट्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटर शिखर धवन याची आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत एन्ट्री झाली आहे. त्यामुळे तो पुन्हा एकदा चर्चेत आलाय. शिखर धवन याने २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती घेतली होती. त्यामुळे यावेळी तो चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत खेळाडूच्या रुपात नाही तर एका खास भूमिकेत दिसणार आहे. पाकिस्तानच्या यजमानपदाखाली होत असलेल्या यंदाच्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत त्याला ॲम्बेसिडरचा मान मिळाला आहे.

२०१७ नंतर यंदाच्या वर्षी आयोजित करण्यात आलेली आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा १९ ते ९ मार्च या कालावधीत खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेतील भारतीय संघाचे सर्व सामने दुबईत खेळवण्यात येणार असून उर्वरित सामने पाकिस्तानमधील वेगवेगळ्या स्टेडियमवर रंगणार आहेत. या स्पर्धेला अवघे काही दिवस बाकी असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं (खउउ) चार म्बेसिडरची नियुक्ती केलीये. यात शिखर धवनच्या नावाचा समावेश आहे.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत शिखर धवनशिवाय पाकिस्तानचा माजी कर्णधार सरफराज अहमद, ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू शेन वॉटसन आणि न्यूझीलंडचा टिम साउदी यांचा समावेश आहे. हे चार म्बेसिडर प्रत्येक सामन्यादरम्यान स्टेडियमवर उपस्थितीत असतील. एवढेच नाही तर स्पर्धेच्या सामन्याचे खास विश्लेषणही करताना दिसतील. गत हंगामात पाकिस्तानच्या संघाने फायनलमध्ये भारताला पराभूत करत आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकली होती. या संघाचे नेतृत्व सरफराज अहमदनं केले होते. त्यामुळे पाकनं त्याला खास मान दिल्याचे दिसते.



### 'नव्या भूमिकेसाठी उत्सुक'

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा भाग होणं ही एक खास अनुभव देणारा क्षण असतो. आगामी स्पर्धेत म्बेसिडरच्या रुपात या स्पर्धेशी जोडलं जाणं सन्मानजनक वाटते. ही स्पर्धा माझ्यासाठी खूपच खास आहे. कारण या स्पर्धेतील अविस्मरणीय क्षण आजही मनात घर करून आहेत, अशा शब्दांत शिखर धवनने नव्या भूमिकेसाठी उत्सुक असल्याचे मत व्यक्त केले आहे.



# उलव्यातील वॉकेथॉनला उत्तम प्रतिसाद

**कॅन्सरचा जागर**

**उरण : बातमीदार**

दिवसेंदिवस कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन दिपीशा कॅन्सर सेंटर आणि रिसर्च इन्स्टिट्यूट तर्फे उलवे येथे कॅन्सरच्या जनजागृतीसाठी दिपीशा फौंडेशनच्या संस्थापक डॉ. दिपाली गोडघाटे यांनी वॉकेथॉनचे आयोजन केले होते.

ही वॉकेथॉन तीन गटांत झाली. सहभागींना टी-शर्ट आणि मेडल दिले गेले. उलवे येथील रिलायन्स जिओ इन्स्टिट्यूट टॉवरजवळ उत्साहात ही वॉकेथॉन झाली. उत्तम प्रतिसाद लाभला. या वेळी डॉ. राजेश पटेल, डॉ. विकास गुप्ता, डॉ. डोनाल्ड बाबू, माजी जिल्हा परिषद सदस्य पार्वतीताई पाटील, मेडिकल असोसिएशनच्या सीमा पाटील, ॲड. प्रतिभा पाटील, 'फिनिक्स'च्या संस्थापक रेखा चिरनेरकर, रोटरी क्लब ऑफ उलवे नोडचे सर्व माजी रोटरियन्स हिरीरीने सहभागी झाले होते.ए. आर. फिटनेसच्या अनिता रॉय यांनी झुंबा सादर करून रसिकांचा आपल्या तालावर थिरकवले. नितेश पंडित यांनी सूत्रसंचालन केले.

# रजत पाटीदार आरसीबीचा यंदाच्या हंगामाचा कर्णधार



**मुंबई : प्रतिनिधी**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने आज म्हणजे गुरुवारी, आपल्या नव्या कर्णधाराच्या नावाची घोषणा केली. विशेष म्हणजे पहिल्यांदाच आरसीबी संघाच्या नेतृत्त्वाची धुरा एका युवा खेळाडूच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. तो युवा खेळाडू दुसरा कोणी नसून रजत पाटीदार आहे.

गेल्या हंगामात म्हणजेच आयपीएल २०२४ मध्ये, दक्षिण आफ्रिकेचा फाफ डू प्लेसिस आरसीबीचे नेतृत्व करताना दिसला होता, परंतु संघाने त्याला आयपीएल २०२५ साठी कायम ठेवले नाही. त्यानंतर मेगा लिलावात पुन्हा खरेदी केले नाही.

आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून ते १७ व्या हंगामापर्यंत संघात अनेक मॅचविनर्स आणि स्टार खेळाडू असूनही, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला एकदाही विजेतेपद जिंकता आलेले नाही. आरसीबी संघ आतापर्यंत फक्त ३ वेळा अंतिम फेरीत पोहोचला आहे, ज्यामध्ये त्यांना सर्व वेळा पराभवाचा सामना करावा लागला आहे. यामुळे संघाच्या नेतृत्वातही बदल दिसून आले आहेत. गेल्या तीन हंगामात फाफ डू प्लेसिस आरसीबीचे कर्णधारपद सांभाळत होता, त्याला मेगा लिलावापूर्वी संघाने कायम ठेवले नव्हते आणि त्यानंतर तो आयपीएल २०२५ साठी आरसीबी संघाचा भाग नाही.

# सचिन इलेव्हन संघ ठरला विजय पाटील ट्रॉफीचा मानकरी



**खारघर : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विजय एस पाटील ट्रॉपीवर सचिन इलेव्हन संघाने आपला नाव कोरत मानाचा चषक प्राप्त केला आहे. ६ ते ९ दरम्यान आयोजित करण्यात आलेली हि स्पर्धा देहरंग मैदानावर पार पडली. ३२ संघानी यात सहभाग घेतला. केळंजाई क्रिकेट संघ उपविजेता ठरला तर आई गावदेवी इलेव्हन संघ लहान धामणी आणि साई स्टार क्रिकेट संघ भेकरा या संघानी अनुक्रमाने तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावला. या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज चतुर्थ क्रमांक क्षेत्ररक्षक अशी अश पारितोषिके देखात आली. या सार्धमध्ये आकर्षक बसीस आकर्षक स्पोर्ट सायकल ठेवण्यातू आती होती. केळंजाई क्रिकेट संघाचे नामदेव दुमणे हा उत्कृष्ट खेळाडू म्हणुन निवडण्यात आला.नवी मुंबई स्पोर्ट असोशियसन सचिव विजय पाटील यांच्या माध्यमातून सतत पाच वर्षांपासून आदिवासी बांधवासाठी हि स्पर्धा आयोजित करण्यात येते.

# रायगडच्या मिडलाईन संघाने राजाभाऊ देसाई चषक जिंकला

**मुंबई : प्रतिनिधी**

स्पर्धेतील आपल्या पहिल्याच साखळी सामन्यात पराभवाची झळ सोसणार्या रायगडच्या मिडलाइन ॲकॅडमीने ठाणे महानगरपालिकेला धक्का देत स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या राजाभाऊ देसाई स्मृतीचषक व्यावसायिक कबड्डी स्पर्धेत जेतेपदाला गवसणी घातली. मिडलाइनने ठाणे महापालिकेचे आव्हान ३२-२२ असे सहज परतावून लावत प्रभादेवीत पहिल्यांदाच जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

प्रभादेवीच्या चवन्नी गल्लीत जयश्री सावंत क्रीडानगरीत अंतिम सामना पाहाण्यासाठी हजारोच्या संख्येने कबड्डीप्रेमींनी तूफान गर्दी केली होती. पण प्रेक्षकांना अपेक्षित थरार अनुभवता आला नाही. मिडलाइनने मुंबई पोस्टलविरुद्ध जोरदार खेळ दाखवत मध्यंतरालाच २१-१७ अशी आघाडी घेतली होती. मध्यंतरानंतर पोस्टलच्या सौरभ कुलकर्णी आणि शुभम रहाटेने वेगवान खेळाच्या जोरावर संघाला बरोबरीत आणले होते. मात्र मिडलाईनने शेवटच्या क्षणी सामन्यावर आपली पकड मजबूत करत अंतिम फेरीत धडक मारली. शेवट आघाडी घेत ३९-३२ अशा फरकाने मिडलाईनने विजयावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर मिडलाइनने आपला हाच खेळ अंतिम फेरीतही कायम राखत कबड्डीप्रेमींना सहज कसे जिंकतात हे दाखवले.




प्रफुल्ल झावरे आणि शुभम दिडनाथने अंतिम सामन्यात चढाई-पकडींचा सुसाट खेळ सादर करत मिडलाईनला मध्यंतराला २२-५ अशी जबरदस्त आघाडी मिळवून देत विजयपथावर नेले. मध्यंतरानंतर ठाणे महापालिकेच्या जावेद पठाण आणि सिद्धेश तटकरे यांनी मिडलाईनवर लोण चढवत सामन्यात रंगत आणण्याचा प्रयत्न केला, पण तो अपुरा ठरला. मिडलाईनने ३२-२२ अशा दणदणीत विजयासह स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत आपले पहिले-वहिले जेतेपद संपादले. त्यांचा प्रफुल्ल झावरे स्पर्धेतील सर्वोत्तम कबड्डीपटू ठरला. त्यांच्याच खेळाने मिडलाइनला अनपेक्षितपणे जेतेपद जिंकता आले नाही. त्यांचाच बिट्टू बनिवाल स्पर्धेतील सर्वोत्तम पकडवीर ठरला तर ठाणे महानगरपालिकेच्या साईराज कुंभारने सर्वोत्कृष्ट चढाईपटूचा मान मिळवला.

त्याआधी ठाणे महानगरपालिकेने दुसऱ्या उपांत्य सामन्यात रुपाली ज्वेलर्सचा ४३-२४ असा धुव्वा उडवत अंतिम फेरीत धडक मारली होती. नेहमीच कबड्डीपटूच प्राथमिकता असलेल्या स्वामी समर्थ क्रीडा मंडळाने संघासह खेळाडूंवरही पारितोषिकांचा वर्षाव केला. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूला ५ ग्रॅमचे तर सर्वोत्तम चढाईपटू आणि पकडवीराला ३ ग्रॅम सोन्याच्या नाण्याने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा आमदार सुनील शिंदेसह स्पर्धा आयोजक आणि आमदार महेश सावंत, मंडळाचे जयराम शेलार आणि शाखाप्रमुख संजय भगत यांच्या उपस्थितीत झाला.

# रोहित, विराट आणि केएल राहुलचा मजेशीर व्हिडीओ व्हायरल



**अहमदाबाद : प्रतिनिधी**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने इंग्लंडचा १४२ धावांनी पराभव करत तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत ३-० असा विजय मिळवला. नाणेफेक गमावल्यानंतर भारताने प्रथम फलंदाजी करत ३५६ धावांचा मोठा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ ३४.२ षटकांत २१४ धावांवर गारद झाला. या सामन्यानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि केएल राहुलचा एक मजेशीर व्हिडीओ व्हायरल होत आहे.

व्हायरल व्हिडीओमध्ये, भारताचे तीन स्टार खेळाडू विराट कोहली, रोहित शर्मा आणि केएल राहुल ट्रॉफी मागे विसरुन पुढे जाताना दिसत आहेत. यानंतर, विराट कोहली काहीतरी म्हणतो. त्यानंतर मग केएल राहुलला आठवते आणि तो मागे वळतो. त्याच वेळी, रोहित शर्मा देखील सोबत जातो आणि नंतर ट्रॉफी उचलतो. दुसरीकडे, विराट कोहलीच्या चेहऱ्यावर हास्य होते. या क्षणाचा व्हिडिओ शेअर करून चाहते टीम इंडियाची खिल्ली उडवत आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com